सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २८१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १२ डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## आंध्र प्रदेशमध्ये भीषण अपघात; खासगी बस दरीत कोसळून १० प्रवाशांचा मृत्यू, २३ जण जखमी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२चित्तूर**

आंध्र प्रदेशमधील अल्लूरी सीताराम राजू जिल्ह्यात शुक्रवारी (१२ डिसेंबर) पहाटे भीषण अपघात झाला आहे. चित्तूर जिल्ह्यातील प्रवाशांना घेऊन निघालेली एक खासगी बस अल्लूरी सीताराम राजू जिल्ह्यातील मरेडुमिल्ली घाटातून जात असताना पहाटे ५.३० च्या सुमारास हा अपघात झाला. चालकाचं बसवरील नियंत्रण सुटल्याने बस दरीत कोसळली. बसमधून एकूण ३७ जण प्रवास (३५ प्रवासी, एक चालक व एक क्लीनर) करत होते. टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार या अपघातात १० जणांचा मृत्यू झाला असून २३ जण जखमी झाले आहेत.

बस दरीत कोसळल्यानंतर स्थानिक गावकऱ्यांनी मदतकार्य सुरू केलं, त्याचबरोबर या अपघाताबाबत पोलिसांना माहिती दिली. काही मिनिटांनी चिंतूर पोलीस, बचाव पथक व रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या आणि त्यांनी बचावकार्य सुरू केलं. बचावकार्य अजूनही चालू आहे.या अपघाताविषयी मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार बसमधील प्रवासी हे भद्राचलम मंदिरात जाऊन दर्शन घेऊन आले होते. तिथून ते अन्नवरमला जात होते. या समुहाने चित्तूरमधून बस भाड्याने घेतली होती. ही ३५ सीटर बस पूर्णपणे भरली होती. ही बस मरेडुमिल्ली घाटातून जात असताना एका वळणावर चालकाचं बसवरील नियंत्रण सुटलं आणि बस थेट दरीत कोसळली.

**अपघातात १० जणांचा मृत्यू**

बचाव पथकाने बसचा काही भाग कापून आत अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढलं. या अपघातात जखमी झालेल्या प्रवाशांना घटनास्थळापासून १५ किलोमीटर दूर सीएचसी चिंतूर रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तिथे त्यांच्यावर उपचार केले जात आहे. प्रशासनाने सांगितलं की जखमींची प्रकृती स्थिर झाल्यानंतर त्यांना भद्राचलम येथील रुग्णालयात हलवलं जाईल, जेणेकरून त्यांना अधिक चांगले उपचार मिळतील.दरम्यान, या अपघाताची माहिती मिळताच चिंतूरचे उपजिल्हाधिकारी देखील घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी स्थितीचा आढावा घेतला असून ते बचाव मोहिमेवर लक्ष ठेवून आहेत.

## इंडिगोचा गोंधळ सुरूच! DGCA ची कठोर कारवाई; चार वरिष्ठ अधिकारी निलंबित




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२मुंबई**

इंडिगो ही विमान कंपनी गेल्या काही दिवसांपासून चांगलीच चर्चेत आली आहे. देशभरातील इंडिगोच्या विमान सेवेत मोठा व्यत्यय आल्यामुळे हजारो विमाने रद्द झाली आणि देशभरातील विमानतळांवर हजारो प्रवासी अडकून पडले. यामुळे प्रवाशांना प्रचंड मनस्तापाला समोरे जावे लागले होते. यानंतर आता भारताची विमान वाहतूक नियामक संस्था म्हणजेच नागरी विमान वाहतूक महासंचालनालयानेआपल्या चार फ्लाइट ऑपरेशन्स इनस्पेक्टर्सवर निलंबनाची कारवाई केली आहे. इंडिगोची विमान वाहतूक विस्कळीत झाल्याच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली आहे.

निलंबित करण्यात आलेले अधिकारी हे एफओआय म्हणून ओळखले जातात, आणि ते डीजीसीएचे वरिष्ठ सदस्य आहेत. या अधिकार्यांकडे नियमन करणे, सुरक्षा देखरेख यासंबंधी जबाबदारी असते. तसेच विमान कंपनीच्या कामकाजावर लक्ष ठेवण्याची त्यांची नियमितपणे नेमणूक केली जाते.निलंबित केलेल्या अधिकार्यांमध्ये कन्सल्टंट ऋष राज चॅटर्जी, एसएफओ सीमा झमनानी, कन्सल्टंट अनिल कुमार पोखरियाल, आणि कंसल्टंट प्रियम कौशिक यांचा समावेश आहे.एफओआय हे डीजीसीएचे ते अधिकारी असतात ज्यांना विमान कंपनीच्या ऑपरेशन्सवर देखरेख ठेवण्यासाठी नियुक्त केले जाते, आणि ते विमान कंपनीच्या नियामक देखरेखीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. इंडिगोच्या सेवांमध्ये गेल्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणात झालेल्या अडथळ्यांबाबत चार फ्लाइट ऑपरेशन्स इन्स्पेक्टरना निलंबित करण्यात आले आहे, असे एका सूत्राने सांगितले.

इंडिगोने शुक्रवारी एका दिवसात बंगळुरू विमानतळावरील ५० हून अधिक विमान उड्डाणे रद्द केली. सुत्रांनी पीटीआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या माहितीनुसार, इंडिगोने शुक्रवारी बंगळुरू विमानतळावर ५४ फ्लाइट्स रद्द केल्या, ज्यापैकी ३१ विमाने तेथे येणारी आणि २३ विमाने तेथून उड्डाण करणारी होती. कंपनीने गुरुवारी दिल्ली आणि बंगळूरूमधून होणारी २०० हून अधिक उड्डाणे रद्द केली होती.

## आगामी महापालिका निवडणुकांबाबत शिंदे -चव्हाण या दोन्ही नेत्यांमध्ये संवाद



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२नागपूर**

गुरुवारी रात्री उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी जात भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी चर्चा केली. आगामी महापालिका निवडणुकांबाबत दोन्ही नेत्यांमध्ये संवाद झाला. या चर्चेतून येत्या महापालिकांमध्ये महायुती म्हणून निवडणूक लढवण्याचा वरिष्ठ नेत्यांनी ठाम निर्णय घेतला आहे. त्यात स्थानिक पातळीवर ४-५ नेत्यांच्या समन्वय समिती नेमली जाईल. मुंबई, ठाणे यासारख्या प्रमुख महापालिकांबाबत वरिष्ठ स्तरावर १०० टक्के महायुती करण्याचा निर्णय नेत्यांनी घेतला असल्याची घोषणा भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिली. नागपूर येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

यावेळी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले की, महापालिका निवडणुकीत महायुती म्हणून सकारात्मकपणे पुढे गेले पाहिजे असा निर्णय पक्षाने घेतला आहे. त्यासाठी प्रत्येक महापालिका निवडणुकीच्या स्तरावर ४-५ प्रमुख नेत्यांची समिती बनवली जाईल. ही समिती महायुतीबाबत प्राथमिक स्वरुपात चर्चा करेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महायुतीचं सरकार आहे. त्यात जनतेच्या हित याला प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे. भविष्यातील लोकहित आणि विकासात्मक धोरणातून सकारात्मक संदेश खालच्या स्तरापर्यंत जाणे गरजेचे आहे. त्यामुळे सर्व ठिकाणी महायुती म्हणूनच निवडणूक लढण्याचा सकारात्मक दृष्टीकोन आहे असं त्यांनी सांगितले.

तसेच राजकारणात वैर हा शब्द कधी असूच शकत नाही. राजकारणात मित्रत्व कधी होईल हे सांगता येत नाही. त्यामुळे इतर गोष्टीचा विचार न करता जनतेचे हित हे फार महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्या त्या दृष्टीने ज्या ज्या शक्यता आहे त्याचा विचार महायुतीत करण्याचं काम वरिष्ठ पातळीवर करण्याचा निर्णय झाला आहे. महायुती म्हटलं तर त्यात सर्व घटक पक्ष शिंदेसेना, राष्ट्रवादी, आरपीआय आणि इतरही पक्ष आहेत. त्यामुळे सर्वच पक्षातील नेत्यांची कमिटी तयार करून त्या त्या पातळीवर निर्णय घेण्याचे महायुतीत ठरले आहे असंही रवींद्र चव्हाण यांनी म्हटलं.

## काँग्रेस नेते माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १२ लातूर**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे नुकतेच निधन झाले आहे. वयाच्या ९० व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घ`तला. मराठवाड्यातील लातूर येथील राहत्या घरी त्यांचे निधन झाले. काँग्रेसचे निष्ठावान म्हणून ते ओळखले जातात. अनेक वर्षे त्यांनी काँग्रेसमध्ये काम केले. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते, त्यांच्यावर उपचार सुरु होते, अखेर १२ डिसेंबर रोजी त्यांनी राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला.शिवराज पाटील चाकूरकर हे लोकसभेचे सभापती आणि विविध केंद्रीय मंत्रीपदांवर कार्यरत होते. त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत देशासाठी अनेक प्रतिष्ठित पदे भूषवली आणि त्यांनी देशातील संवैधानिक प्रक्रियेत सक्रिय भूमिका बजावली होती.



शिवराज पाटील हे लातूरमधील चाकूर येथील प्रभावी काँग्रेस नेते होते. त्यांनी लातूर लोकसभा मतदारसंघातून ७ वेळा विजय मिळवला होता.

शिवराज पाटील चाकूरकर हे २००४ मध्ये लोकसभेतून पराभूत झाल्यानंतरही राज्यसभेतून गृहमंत्रिपद आणि केंद्रीय जबाबदाऱ्या स्वीकारल्या होत्या. काँग्रेस आणि त्यांच्या संघटनेतील सर्व कार्यकर्त्यांनी त्यांच्या निधनावर दुःख व्यक्त केले आहे आणि त्यांच्या कुटुंबीयांसोबत शोकसंवेदना व्यक्त केली आहे. त्यांच्या निधनामुळे कुटुंबीयांना मोठा धक्का बसला.

## मुंबईतील ७० टक्के मुस्लीम बहुल भागात एकनाथ शिंदेना पसंती; भाजपाच्या सर्व्हेतून काय आलं समोर?



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२मुंबई**

आगामी मुंबई महापालिका निवडणुकीला महायुती म्हणूनच सामोरे जायचे असं भाजपा आणि शिंदेसेना यांच्यात एकमत झाले आहे. गुरुवारी रात्री भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या भेटीनंतर महायुती म्हणूनच निवडणूक लढवण्याचा निर्णय झाला आहे. त्यातच भाजपाने केलेल्या सर्व्हेचा रिपोर्ट समोर आला आहे. या रिपोर्टनुसार मुंबईतील मुस्लीम बहुल भागात भाजपापेक्षा एकनाथ शिंदे यांनाच अधिक पसंती असल्याचं नमूद करण्यात आले आहे.

मुंबईत ७० टक्के मुस्लीम समाज असलेल्या १८ वार्डाचा सर्व्हे भाजपाने केला आहे. या भागात महायुतीत शिंदेसेनेचे उमेदवार दिल्यास त्याचा फायदा होऊ शकतो असं बोललं जात आहे. मुस्लीम महिलांमध्ये एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीत सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेचा प्रभाव आहे. मुंबईत १८ जागी ५० टक्के तर ७ जागांवर ३५ टक्के मुस्लीम समाज आहे. या भागात भाजपापेक्षा एकनाथ शिंदे यांना जास्त पसंती मिळतेय असं सर्व्हेमध्ये पुढे आले आहे. तर या सर्व्हेबाबत एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सध्या जागांबाबत काही चर्चा नाही. आम्ही ज्या योजना आणल्या त्यात कुठेही भेदभाव केला नाही. सर्वसमावेशक अशा योजना आम्ही राबवल्या. विकास करतानाही काही फरक केला नाही. लोकाभिमुख कल्याणकारी लाडकी बहीण योजना आणतानाही आम्ही कुठेही भेदभाव केला नाही असं शिंदे यांनी म्हटलं आहे.

## मनरेगाचं नाव बदलणार, मंत्रीमंडळाच्या बैठकीत शिक्कामोर्तब होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ नवी दिल्ली**

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी मनरेगा अर्थात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नाव बदलण्यात येणार असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. माध्यमांनी सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार, आज केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मनरेगाचे नाव 'पूज्य बापू ग्रामीण योजना' करण्याच्या प्रस्तावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.

आता या योजनेचे नाव बदलून 'पूज्य बापू ग्रामीण योजना' केले जाण्याची शक्यता आहे, यावर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय होण्याची शक्यता आहे.

मनरेगा चे नाव सुरुवातीला 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा' असे होते. मात्र नंतर, त्यात बदल करून 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा' करण्यात आले. ही योजना ग्रामीण विकास मंत्रालयांअंतर्गत २००५ मध्ये सुरू झाली होती. जी 'काम करण्याच्या अधिकाराची' हमी देते.

## विधीमंडळ प्रवेशाच्या पासेसची दीड हजारांत विक्री

### परिषदेतील आमदाराचा खळबळजनक दावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२नागपूर**

विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी विधानपरिषदेतील शिवसेना सदस्य हेमंत पाटील यांनी खळबळजनक आरोप केला आहे. विधीमंडळात परिसरात प्रवेशासाठीच्या अभ्यागतांच्या पासेसची दीड हजारांत विक्री होत असल्याचा आरोप त्यांनी केला. यामुळे विधीमंडळ वर्तुळात खळबळ उडाली आहे.

विधानपरिषदेत बोलताना त्यांनी याबाबत माहिती दिली. आमचे काही कार्यकर्ते दिवसभर बाहेर उभे होते. मात्र आमचे पत्र असूनदेखील त्यांना पासेस मिळाल्या नाहीत. परंतु बाहेर दीड हजारांत प्रवेशासाठी पासेस विकण्यात येत आहेत. अशा



पद्धतीने तर विधीमंडळाची सुरक्षाच धोक्यात आली असून ही लाजीरवाणी बाब आहे. अशा पद्धतीने तर कधीही दहशतवादी आत शिरू शकतात. अशा पद्धतीने कुणी पासेस जारी केले व त्या बदल्यात पैसे घेतले याची चौकशी करण्यात यावी अशी मागणी पाटील यांनी केली. यावर अमोल मिटकरी यांनीदेखील आक्रमक पवित्रा घेतला. यंदा परिसरात गर्दी टाळण्यासाठी मर्यादित पासेस वाटण्यात येणार असल्याचे अधिवशनाच्या दुसऱ्या दिवशी स्पष्ट करण्यात आले होते. मात्र सद्यस्थितीत परिसरात इतकी गर्दी आहे की नीट चालणेदेखील कठीण झाले आहे. इतके सारे लोक आत कसे काय येत आहेत व इतक्या प्रमाणात पासेस का जारी करण्यात येत आहेत, असा सवाल मिटकरी यांनी उपस्थित केला. यावर तालिका सभापती कृपाल तुमाने यांनी सखोल चौकशी करण्यात यावी, असे निर्देश दिले.

## यवतमाळवरून शिर्डीला देवदर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांचा समृद्धी महामार्गावर भीषण अपघात; दोघांचा जागीच मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२कारंजा लाड**

समृद्धी महामार्गावरून भीषण अपघाताची घटना उघडकीस आली आहे. यवतमाळवरून शिर्डीला देवदर्शनासाठी जात असताना पीकअप मालवाहू वाहन आणि कारचा भीषण अपघात घडला. कारमधून भाविक देवदर्शनासाठी जात होते. मात्र, शिर्डीला पोहोचण्याआधीच वाशिमच्या कारंजा तालुक्यातील धनज पोलीस स्टेशन हद्दीत हा भीषण अपघात घडला. या अपघातात दोघांचा जागीच तर, दोन जण जखमी




झाले आहेत. हा अपघात रात्री घडला असून, पोलिसांची चौकशी सुरु आहे.

प्राथमिक माहितीनुसार, वाशिमच्या कारंजा तालुक्यातील धनज पोलीस स्टेशन हद्दीत हा भीषण अपघात घडला असल्याची माहिती आहे. यवतमाळहून काही जण कारमधून प्रवास करत होते. ते शिर्डीच्या दिशेनं जात होते. मात्र, शिर्डीला पोहोचण्याआधीच त्यांच्या कारचा भीषण अपघात घडला.समृद्धी महामार्गवर भरधाव पीकअप वाहनानं अचानक ब्रेक मारला. यामुळे भरधाव वेगात धावणारी कार अनियंत्रित होऊन या पिकअपवर धडकली. या अपघातात कार चालक मंगेश आणि विक्रम अशोकराव सौरगपते( वय ४०) रा. यवतमाळ यांचा जागीच मृत्यू झाला. तर अनुकूल मनोज यादव (वय ३५) रा.दत्त चौक यवतमाळ आणि मयूर दीपक डोनाडकर (वय २९ )रा.दत्त चौक यवतमाळ हे गंभीर जखमी झाले.

अपघात घडल्यानंतर स्थानिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तसेच जखमींना वाचवण्याचा प्रयत्न केला. स्थानिकांनी या अपघाताची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन मृत व्यक्तींना शवविच्छेदनासाठी रूग्णालयात पाठवले. सध्या जखमींवर कारंजा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, हा अपघात नेमका कसा घडला? याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## तीन महिन्यांत केवळ ९८ मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्र

### मुख्यमंत्री साहेब अन् विखे पाटील साहेब म्हणत जरांगेंचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२बीड**

हैद्राबाद गॅझेटीआरनुसार नोंदी आढळतील त्या मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्र दिले जावेत यासाठी मनोज जरांगे यांनी ३ महिन्यांपूर्वी मुंबईमध्ये उपोषण केलं होतं. त्यानंतर सरकारने जीआर काढत ही मागणी मान्य देखील केली होती. मात्र ही मागणी मान्य झाल्यानंतर मराठवाड्यातील केवळ ९८ अर्जदारांना ओबीसी प्रमाणपत्र दिली गेली आहेत. दुसरीकडे ८ जिल्ह्यातून ५९४ अर्ज आले आहेत. मात्र त्यातून केवळ १८ टक्के लोकांना प्रमाणपत्र मिळाली आहेत. त्यामुळे मनोज जरांगे यांनी सरकारला इशारा दिला आहे.



या जीआरबाबत अर्ज येऊनही प्रमाणपत्र मिळत नसल्याचा गैरसमज कुणा पसरवू नये. तसेच सरकारने गतीने हे प्रमाणपत्र द्यावेत. अधिकाऱ्यांनी कोणतीही दिरंगाई करता कामा नये. आम्ही ही लढाई जिंकलेलो आहोत. हैद्राबाद गॅझेटीआरचा जीआर आमच्या हाती आलेला आहे. हे आमचे मोठे यश आहे. तसेच पुढे बोलताना जरांगे यांनी मुख्यमंत्री आणि विखे पाटलांना देखील इशारा दिला आहे.

## संपादकीय ......

# ५० खोके ते कॅश बॉम्ब!

*साडेतीन वर्षांपूर्वी महाराष्ट्रात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बंडखोरीमुळे शिवसेनेत फूट पडली आणि बाळासाहेब ठाकरेंनी स्थापन केलेल्या शिवसेनेची शिंदेंची शिवसेना आणि ठाकरेंची शिवसेना अशी ओळख बनली. याच ५० खोक्यांवरून आजही फुटलेल्या आमदारांना डिवचले जाते. हे सर्व सांगण्याचे कारण म्हणजे दोन दिवसांत फुटलेले आरोपांचे कॅश बॉम्ब! यातील पहिला कॅश बॉम्ब ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी अधिवेशनाच्या दुसर्या दिवशी फोडला.*

*या व्हिडीओत अलिबागचे आमदार महेंद्र दळवी दिसत असून पैशांची थप्पीही दिसत आहे. यावरून दानवेंनी त्यांना लक्ष्य केले. तर दुसर्या दिवशी शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या चित्रलेखा पाटील यांनीही महेंद्र दळवींना घेरले आणि दुसरा कॅश बॉम्ब त्यांनी मंत्री भरत गोगावले यांच्यावर टाकला. आता हे व्हिडीओ खरे आहेत की मॉर्फ केलेले यावरून आरोप-प्रत्यारोप होत राहतील. पण कॅश बॉम्बच्या निमित्ताने शिंदेंची शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्यात शाब्दिक द्वंद्व सुरू आहे. एक बाब लक्षात घेतली पाहिजे, कॅश बॉम्बचा हा काही पहिलाच व्हिडीओ नाही. अशाच पद्धतीचा व्हिडीओ याआधी धुळ्यातील शासकीय विश्रामगृहातून व्हायरल झाला होता.*

*२२ मे २०२५ रोजी आमदार आणि विधिमंडळ समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर यांचे स्वीय सहाय्यक किशोर पाटील यांच्या नावावर जी रूम बूक होती या रूममधून तब्बल १ कोटी ८४ लाख ८४ हजार रुपयांचे घबाड सापडले होते. धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील विकासकामांची पाहणी करण्यासाठी ११ आमदारांचे शिष्टमंडळ आले होते. त्यावेळी आमदार अनिल गोटे यांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी छापा टाकल्यानंतर हे घबाड हाताशी लागले होते. दुसरी घटना मंत्री संजय शिरसाट यांच्याबाबत घडली होती. जुलै २०२५ मध्ये ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी एक व्हिडीओ ट्वीट केला होता. त्यात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट त्यांच्या बेडरूममध्ये बसलेले दिसत होते आणि त्यांच्या शेजारी पैशांनी भरलेली बॅग दिसत होती.*

*या दोन्ही व्हिडीओंवरून प्रचंड गदारोळ झाला होता. ते पैसे कुठले, कुठून आले, याचा काहीही पत्ता लागला नाही. राजकीय आरोप-प्रत्यारोपांत मूळ मुद्दा वाहून गेला. तर शासकीय विश्रामगृहात जप्त केलेल्या १ कोटी ८४ लाख ८४ हजार कुठून आले, हेही स्पष्ट झाले नव्हते. त्यानंतर आता हिवाळी अधिवेशन सुरू असताना ८ आणि ९ डिसेंबर रोजी दोन व्हिडीओ व्हायरल करून आमदार महेंद्र दळवी आणि मंत्री भरत गोगावले यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न झाला. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीच्या काळात आणि नगरपरिषदांच्या निवडणुकीतही बॅगेतून पैसे नेल्याचा आरोप खुद्द एकनाथ शिंदे यांच्यावर झाला होता. या सर्वांना जोडणारा समान धागा म्हणजे हे सर्व आमदार शिवसेनेचे आहेत. यात आणखी एक समान धागा म्हणजे पहिल्या दोन्ही प्रकरणांचे पुढे काहीही झालेले नव्हते.*

*आताच्या व्हिडीओंची चौकशी करण्याची मागणी होत असली तरी हे आरोप सभागृहाबाहेर होत आहेत. दोन्ही बाजूंनी आरोप, दावे, प्रतिदावे केले जात आहेत. त्यामुळे यातून काही साध्य होईल, असे सध्यातरी सांगता येत नाही. तसेच क्लीन चिट देण्याची परंपरा, शिवाय सत्ताधारी पक्षाचे आमदार असल्यामुळे काही होण्याची शक्यताही दिसत नाही. तंत्रज्ञानाचा वापर करत व्हिडीओ व्हायरल करणे, आता सहज शक्य झाले आहे. तसे प्रकार होत आहेत. मात्र, यातून एक बाब प्रकर्षाने लक्षात आली आहे ती म्हणजे राज्यातील राजकारणात पैशांचा महापूर वाहात आहे. पैशांचा अवास्तव वापर, हे महाराष्ट्रातील राजकीय अंग झाल्याची काही वर्षांपासून चर्चा होत आहे. आताही नगर परिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीत मालवणमध्येही असाच प्रकार उघडकीस आला होता.*

*शिवसेनेचे आमदार निलेश राणे यांनी एका कार्यकर्त्याच्या घरी धाड टाकून २५ लाख रुपये पोलिसांना जप्त करायला लावले होते. त्यानंतर हे पैसे निवडणुकीपूर्वी वाटण्यासाठी आणल्याचा आरोप झाला होता. त्यापुढे जात हे पैसे व्यावसायिकाचे होते, अशी बाजू मांडण्याचा प्रयत्न झाला. तरीही एक व्यक्ती किती रोख रक्कम बाळगू शकते, याला नियम आहेत. तो नियम पाळला गेला का, याचे उत्तर मिळत नाही. आता मालवणमधील विषयही बाजूला पडला आहे. निवडणुका पैशांचा खेळ बनला आहे आणि अगदी ग्रामपंचायत, नगर परिषदांच्या निवडणुकांसाठी उमेदवाराला कोटीच्या घरात खर्च करावा लागत असल्याची उघड चर्चा होत आहे. आता प्रश्न उपस्थित होतो की, निवडणुकीसाठी लाखो किंवा कोटीच्या घरात रुपये खर्च करून कुणी समाजसेवा करत नाही. तसेच आमदार किंवा खासदार म्हणून मिळणारे वेतन खर्च केलेल्या रकमेपेक्षा खूपच कमी असते.*

*ग्रामपंचायत आणि नगर परिषदांचा आवाका खूपच कमी असल्यामुळे लाखो रुपये खर्च करून निवडणूक लढवणारे उमेदवार आम्ही समाजकार्य करण्यासाठी आलो, असे म्हणत असतील तर कसा विश्वास ठेवायचा? तसेच नगरसेवक किंवा आमदार झाल्यानंतर त्यांची झपाट्याने बदलणारी आर्थिक परिस्थिती पाहिल्यानंतर लोकांची कामे किती होतात आणि स्वहित किती साधले जाते, हे सांगायला कुणाचीही गरज उरलेली नाही. काही गोष्टी खुलेआम चालतात मात्र, त्यावर खुलेआम चर्चा केली जात नाही, एवढंच! आपल्याकडेही यापेक्षा फार काही वेगळे घडत नाही. सर्वत्र पैशांचा बाजार मांडला जात आहे. खरे तर कॅश बॉम्ब वगैरे किती खरे किती खोटे, हा मुद्दा खरोखरच बाजूला ठेवा. यामागची मानसिकता लक्षात घ्यायला हवी, जी लोकशाहीसाठी घातक आहे.*

## नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा २०२७

# बोधचिन्ह स्पर्धेत सहभागासाठी आता राहिले फक्त दहा दिवस

### जास्तीत जास्त नागरिकांनी २० डिसेंबरपर्यंत प्रवेशिका पाठविण्याचे प्राधिकरणाचे आवाहन

### सर्वोत्कृष्ट बोधचिन्हास मिळणार तीन लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२नाशिक-** श्रद्धा, पावित्र्य आणि अध्यात्माचा संगम असलेला सिंहस्थ कुंभमेळा नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणार आहे. यानिमित्त नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणातर्फे बोध चिन्ह स्पर्धेचे (लोगो डिझाईन) आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभाग नोंदविण्यासाठी आता अवघे दहा दिवस राहिले आहेत. त्यामुळे या स्पर्धेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे अनुक्रमे तीन, दोन आणि एक लाख रुपयांच्या पारितोषिकांसह प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी २० डिसेंबर, २०२५ पर्यंत प्रवेशिका पाठविता येणार आहेत, असे विभागीय आयुक्त तथा नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम यांनी कळविले आहे.

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा जगातील सर्वात मोठ्या आध्यात्मिक मेळाव्यांपैकी एक आहे. तो दर बारा वर्षांनी एकदा राज्यातील नाशिक जिल्ह्यातून वाहणाऱ्या दक्षिण गंगा अर्थात गोदावरी नदीच्या काठावर भरतो. अमृत मंथनाच्या आख्यायिकेत येणारा हा कुंभमेळा श्रद्धा, पवित्रता आणि नवनिर्माणाच्या शाश्वत चक्राचे प्रतीक आहे. बारा जोतिर्लिंगांपैकी एक असलेले त्र्यंबकेश्वर, नाशिकची समृद्ध संस्कृती, मंदिरे आणि घाटांचे आध्यात्मिक आणि ऐतिहासिक प्रतिबिंब या कुंभमेळ्यात दिसते.

नाशिकमधील रामायण स्थळांची भव्यता, नाशिकचे घाट, त्र्यंबकेश्वर आणि गोदावरी नदीचा शाश्वत प्रवाह दोन्ही शहरांना एकत्र



जोडतो. कुंभमेळा एक चैतन्यशील आणि जागतिकस्तरावर मान्यताप्राप्त आध्यात्मिक उत्सव म्हणून वाढत असताना २१ व्या शतकाच्या आकांक्षा प्रतिबिंबित करतो. देशाच्या परंपरेत रुजलेली एक ताजी आणि गतिमान दृश्य ओळख निर्माण करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. नवीन बोधचिन्हाची ओळख भूतकाळातील आवृत्त्यांच्या वारशावर आधारित असेल. भक्ती आणि एकतेची कालातीत भावना अशा स्वरूपात साकार करणारी पाहिजे. आधुनिक, संदर्भात्मक आणि भारत आणि जगभरातील विविध प्रेक्षकांसाठी दृश्यदृष्ट्या आकर्षक असे बोधचिन्ह असावे. एवढेच नव्हे, तर नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या संस्कृती, वारसा, स्थापत्य, विधी आणि नैसर्गिक सौंदर्यातून सहभागींना प्रेरणा मिळू शकेल. बोध चिन्ह संस्मरणीय असावे. ते सर्व व्यासपीठांवर श्रद्धा, उत्सव आणि कालातीत परंपरा व्यक्त करेल. ही रचना कुंभमेळा २०२७ साठी एक वेगळी दृश्य ओळख म्हणून काम करेल. नाशिक-त्र्यंबकेश्वरच्या आध्यात्मिक साराचे आणि भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे प्रतीक हे बोध चिन्ह असावे.


**बोधचिन्हासाठी-** कमाल आकार ५ एमबी (पीडीएफ) असावा. स्पर्धेत दिलेल्या ले-आउटनुसार बोधचिन्हाची डिझाइन ए १ आकाराच्या पोस्टरवर असावे. बोधचिन्हाची रंगीत, कृष्णधवल प्रतिमा आणि बोधचिन्हाबाबत माहिती देणारी १५० शब्दांची टिपणी असावी. स्वाक्षरी केलेल्या आणि स्कॅन केलेल्या अटी आणि शर्तींची कमाल आकार १ एमबी (पीडीएफ) फाइल. संकल्पना टीप, पोस्टर, प्रतिमा, फाइल नावासह, अर्जदाराची ओळख स्थापित करण्यासाठी नाव, संस्थेचे नाव किंवा कोणतेही संदर्भ यासारखी कोणतीही वैयक्तिक माहिती नसावी. या निकषांचे पालन न करणाऱ्या नोंदी अपात्र ठरवल्या जातील. सहभागींनी वर नमूद केल्याप्रमाणे २ स्वतंत्र फाइल्स सादर कराव्यात. योग्यरित्या स्वाक्षरी केलेले घोषणापत्र नसल्यास, प्रवेशिका अपात्र ठरवली जाईल. ही स्पर्धा भारतातील प्रत्येक नागरिकांसाठी खुली आहे. डिझाइन, आर्किटेक्चर आणि कला क्षेत्रातील विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. ही स्पर्धा व्यावसायिक डिझायनर्स, कलाकार, ब्रॅण्ड डिझायनर्स आणि नाविन्यपूर्ण कल्पना मांडू शकणाऱ्या सर्वांसाठी खुली आहे. प्रत्येक सहभागीला फक्त १ प्रवेशिका पाठविण्याची परवानगी राहील. सहभागी स्पर्धकाचे वय किमान १२ वर्षे असावे. एखाद्या गटाने प्रवेशिका दिली असेल, तर एका व्यक्तीला संघाचा प्रमुख आणि प्रवेशिका म्हणून मानले पाहिजे. बोधचिन्हाची दृश्य ओळख विशिष्ट ओळख घटकांसह प्रदर्शित केलेली पाहिजे. रंगांचा पॅलेट, दृश्य आकृतिबंध, टाइपफेस, दृश्य अँकर आणि त्याचे अनुप्रयोग जसे की, साइनेज, ब्रँडिंग, स्ट्रीट फर्निचर, प्रवेश पास, स्टेशनरी, झेंडे, व्यापारी माल इत्यादींवर दाखवले पाहिजे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी अधिक माहितीसाठी www.mygov.in किंवा ntkmal ogoco mpetitio ngmai l.com या ई-मेल आयडीवर संपर्क साधावा, असे आवाहन कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. गेडाम यांनी केले आहे.




# मेथी खाल्ल्याने काय फायदे होतात ?

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक**

आजच्या धावत्या पळत्या जगात लाखो लोकांसाठी अशक्तपणा किंवा रक्ताची कमतरता ही एक समस्या बनली आहे. थकवा, अशक्तपणा, चक्कर येणे किंवा चेहरा फिकट होणे ही सामान्य लक्षणे सध्या सर्वांमध्ये आढळत आहेत. यासाठी बरेचदा आपण अनेक औषधांचं सेवन करोत. मात्र औषधांशिवाय आपल्या



घरीचं एक गुणकारी वस्तू आहे हे तुम्हाला माहित आहे का ?. आयुरवेदानुसार मेथी खाल्ल्याचे अनेक फायदे आहेत. मेथी खाल्ल्याने रक्त वाढ, आयन आणि पचन प्रक्रियेत सुधारणा होण्यात मदत होते. अजून काय काय फायदे आहेत मेथी खाल्लाचे ते आपण पाहणार आहेत.

**मेथी खाल्ल्याने काय फोयदे होतात ?**

मेथीची भाजी खाल्ल्याने शरीर मजबूत होण्यास मदत होते. मासिक पाळीच्या वेळी अशक्तपणा असलेल्या महिलांसाठी किंवा हिमोग्लोबिनची पातळी कमी असलेल्या मुलांसाठी मेथी खूप फायदेशीर ठरू शकते. मेथी खाल्ल्याने शरीरातील जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्स अशक्तपणा दूर करण्यास मदत होते. मेथी नियमितपणे खाल्ल्याने स्नायू आणि हाडे मजबूत होतात आणि शरीरातील मेटाबॉलिजम बूस्ट होतं.

**मेथी कशी सेवन करावी ?**

कोणताही पदार्थ खाल्ल्याने फायदे तेव्हाच मिळतात जेव्हा ते योग्य पद्धतीने खाल्ले जातात. तुम्ही या प्रकारे मेथी खाऊ शकता:

१. मेथीची भाजी २. मेथीचा पराठा ३. मेथी मसूरमध्ये मिसळून ४. भिजवलेले मेथीचे दाणे ५. मेथी सॅलडमध्ये मिसळून खाणे

# लाखोंचं उत्पन्न देणारी जरबेरा फुल शेती, लागवडी पासून ते काढणीपर्यंतची संपूर्ण ए टू झेड माहिती!

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक** विविध विध सजावटीसाठी, कुंड्यामध्ये लावण्यासाठी, फुलदाणीत ठेवण्यासाठी, हिरवळीच्या मध्यावर किंवा कडेला लावण्यासाठी जरबेरा हे फुलझाड चांगले आहे. या फुलांचा उत्तम दर्जा, काढणीनंतर अधिक काळ टिकण्याची क्षमता, फुलांचे विविध आकर्षक रंग आणि आकार इत्यादी गुणधर्मां मुळे जरबेराच्या फुलां पासून हार आणि उत्कृष्ट प्रतीचे गुच्छ तयार करता येतात. या सर्व बाबींचा विचार केला असता देशांतर्गत विक्रीसाठी तसेच परदेशात फुलांची निर्यात करण्यासाठी या फुल पिकाखालील क्षेत्र वाढविण्यास बराच वाव आहे.

**हवामान** - महाराष्ट्रातील उष्ण व कोरड्या आणि समशीतोष्ण हवामानात हे पीक चांगल्या प्रकारे घेता येते. भरपूर सूर्यप्रकाश, मोकळी हवा व सर्वसाधारण ५०० ते ६१५ मिलीमीटर पाऊसमान या पिकाच्या वाढीसाठी योग्य असते. तर अति पाऊस, बराच मोठा काळ अती कडक थंडी व कडक उन्हाळा जरबेराच्या उत्पादनास मानवत नाही. दिवसाचे १२ ते २५ अंश सेल्सिअस तापमान, ५०-६० टक्के आर्द्रता आणि रात्रीचे १२ अंश सेल्सिअस तापमान असल्यास या फुलांचा दर्जा चांगला मिळतो.

**जमीन-** जरबेराच्या

**विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष**

लागवडीसाठी पाण्याचा योग्य निचरा होणारी हलकी, मध्यम काळी किंवा पोयट्याची जमीन अधिक योग्य असते. चोपण मातीच्या, चुनखडीयुक्त आणि पाण्याचा अयोग्य निचरा होणाऱ्या जमिनीत या पिकाची लागवड चांगली होत नाही. त्याचप्रमाणे भारी, काळ्या व अत्यंत सुपीक जमिनीत झाडाची केवळ पालेदार वाढ होते.

आणि फुलांचे समाधानकारक उत्पादन मिळत नाही. म्हणून अशा प्रकारच्या जमिनीत जरबेराची लागवड करू नये. साधारणपणे ३०-४५ सेंटीमीटर मध्यम खोलीची काळी व ५.० ते ७.५ दरम्यान सामू असलेली जमीन जरबेराच्या लागवडीसाठी सर्वात चांगली असते. हलक्या जमिनीतही पुरेशा प्रमाणात सेंद्रिय खते घालून या पिकाची किफायतशीर लागवड करता येते.

**सुधारित जाती-** क्रीम




क्लेमेंटाइन, मरोन क्लेमेंटाइन, फ्लेमिंगो, फ्रेडोरेलो, गोल्डन गेट, ऑरनेला, कोझ्याक, गोल्ड डिस्क, मेलो डिस्क, लेडी, टोरो, स्पिंक्स, सांग्रीया, बित्राफा, लव्हली डिस्क, पसादेना, पारिजात, पालरेमो, पनामा, पामेला, पोलर, झेब्रा, विजय ट्रोपिकल, स्पायडर.

**अभिवृद्धी-** जरबेराची अभिवृद्धी बियांपासून, शाखीय पद्धतीने ऊतीसंवर्धन पद्धतीनेही जरबेराची अभिवृद्धी करता येते.

**लागवड-** जरबेराची व्यापारी तत्वावर शेतात लागवड करताना जास्त पावसाचा काळ वगळता वर्षभर केव्हाही लागवड केली तरी चालते. लागवडीपूर्वी जमीन नांगरून आणि दोनदा वखरणी करून भुसभुशीत करून घ्यावी व २०-३० टन चांगले कुजलेले शेणखत घालून ते मातीत चांगले मिसळून घ्यावे. जून महिन्यामध्ये बियांची गादीवाफ्यावर पेरणी करावी. रोपे ४-६ पानांवर आल्यानंतर शेतात पुनर्लागवड करावी. लागवड करण्यापूर्वी ४५ ते ६० सेंटीमीटर अंतरावर सऱ्या काढाव्यात आणि सरीच्या एका बाजूने ३०-४० से.मी. अंतरावर एका ठिकाणी एक फुटवा (सकर्स) लावून लागवड करावी. लागवड करतांना रोपाचा मधला वाढणारा शेंडा मातीत गाडला जाणार नाही याची काळजी घ्यावी.

**खते आणि पाणी व्यवस्थापन-** जरबेरा हे पीक सेंद्रिय खताच्या वापराला चांगल्या प्रकारे प्रतिसाद देते. त्यामुळे फुलांची चांगली प्रत व काढणीनंतर चांगला टिकाऊपणा पाहिजे असल्यास पिकाला भरपूर प्रमाणात सेंद्रिय खत देणे आवश्यक आहे. या पिकाची व्यापारीदृष्ट्या लागवड करावयाची असल्यास लागवडीपूर्वी शेतात हेक्टरी २०-३० टन चांगले कुजलेले शेणखत टाकावे. याशिवाय लागवडीच्या वेळी हेक्टरी ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ५० किलो पालाश खतांची मात्रा द्यावी.

५० किलो नत्राचा दुसरा आणि तिसरा हफ्ता लागवडीनंतर अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या महिन्यात द्यावा. यामुळे झाडांची जोमदार वाढ होऊन उत्पादनात वाढ होते. जरबेरा या पिकाला योग्य वेळी, योग्य प्रमाणात परंतु नियमित पाणी देण्याची अत्यंत आवश्यकता आहे. फुलांच्या बहाराच्या वेळी प्रमाणापेक्षा जास्त पाणी दिल्यास फुलांची प्रत खराब होण्याची शक्यता असते. यासाठी जमीन व हवामान पाहून गरजेनुसार पावसाळ्या त १०-१२ दिवसांच्या अंतराने, हिवाळ्यात ८-९ दिवसांच्या अंतराने आणि उन्हाळ्यात ४-६ दिवसांच्या अंतराने पिकाला नियमित पाणी द्यावे. पिकाला ठिबक सिंचन पद्धतीने पाणी दिल्यास पिकांची एकसमान वाढ होऊन नियमित उत्पादन मिळते.

**आंतरमशागत-** जरबेराचे पीक जास्त काळ शेतात राहत असल्यामुळे लागवडीपूर्वी शेतातील हराळी, लव्हाळा, कुंदा यासारख्या बहुवर्षायू तणांचा नाश करावा आणि त्यानंतर पिकाची लागवड करावी. लागवडीनंतर तणे उगवून आल्यास वेळोवेळी खुरपण्या करून पीक तणमुक्त ठेवावे. याशिवाय झाडांना मातीचा भर देणे, झाडाच्या बुडाखालील रोगट तसेच सुकलेली पाने काढून टाकणे यासारखी मशागतीची कामे नियमित केल्यास झाडांची वाढ चांगली होऊन उत्तम प्रतीच्या फुलांचे उत्पादन मिळते.

**फुलांची काढणी आणि उत्पादन-** जरबेराची लागवड केल्यापासून दीड ते दोन महिन्यात फुले येण्यास सुरुवात होते. फुलांची काढणी करताना फुलाच्या बाह्य बाजूस असलेल्या फुलातील परागकण परिपक्व झालेले दिसल्यास, अशी फुले जमिनीलगत छाटून घ्यावीत. फुलांची काढणी केल्यानंतर त्वरित फुलांचे दांडे २-३ तास पाण्यात बुडवून ठेवावेत.

यानंतर फुलांचा रंग, दांड्याची लांबी किंवा आकार याप्रमाणे प्रतवारी करून एक ते दोन डझन फुलांच्या जुड्या रबरने बांधून, जुन्या वर्तमानपत्राच्या कागदात गुंडाळून विक्रीसाठी बाजारपेठेत पाठवावे. जरबेराची एकदा लागवड केल्यावर २-३ वर्षे उत्पादन घेता येते. जरबेराचे दरवर्षी हेक्टरी ५-७ लाख फुलांचे उत्पादन मिळते. या पिकाच्या सुधारित जातींची लागवड केल्यास एका झाडापासून प्रति वर्षी ४०-५० फुले मिळतात. पुढील वर्षी उत्पन्न दीड ते दोन पटीने वाढते.

# तिवसा तालुक्यात हळद लागवड तंत्रज्ञान शेतशाळेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२शेंदोळा बुद्रुक** कृषी विभाग आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने मौजा शेंदोळा बुद्रुक, तालुका तिवसा, जिल्हा अमरावती येथे दिनांक ११ डिसेंबर २०२५ रोजी हळद लागवड तंत्रज्ञान व उत्पादन या विषयावर शेती शाळेचे आयोजन करण्यात आले. प्रगतशील शेतकरी श्री. सुभाष लसणापुरे यांच्या शेतावर भरविण्यात आलेल्या या कार्यक्रमाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. कु. हेमलता इंगळे, तालुका कृषी अधिकारी तिवसा यांनी भूषविले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्र, घातखेड येथील विषय विशेषज्ञ प्रा. पी. एन. मेंढे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना हळद पिकावरील कीड-रोग व्यवस्थापन, उत्पादन-वाढीची आधुनिक तंत्रज्ञान, तसेच हरभरा, गहू आणि तूर पिकांच्या प्रगत शेती पद्धतींबाबत सखोल मार्गदर्शन केले. त्यांच्या समर्पक मार्गदर्शनामुळे शेतकऱ्यांमध्ये नव्या तंत्रज्ञानाविषयी उत्सुकता निर्माण झाली आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीची प्रेरणा मिळाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व संयोजन श्री. सचिन हरले, बी.टी.एम., आत्मा यांनी उत्कृष्टपणे पार पाडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. एस. एस. भालेराव (मंडळ कृषी अधिकारी, मार्डी), श्री. पी. एन. कडू (उप कृषी अधिकारी), कु. के. एस. कोहळे (सहाय्यक कृषी अधिकारी, शेंदोळा बु.), श्री. प्रतीक राऊत (सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक, आत्मा) तसेच श्री. स्वप्नील निस्ताने यांचे विशेष योगदान लाभले.

शेती शाळेत नैसर्गिक शेती गटातील शेतकरी, हळद उत्पादक शेतकरी तसेच परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. प्रत्यक्ष शेत निरीक्षण, समस्या निराकरण आणि तांत्रिक सल्ला या माध्यमातून कार्यक्रम अत्यंत उपयुक्त व यशस्वी ठरल्याचे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. १२ डिसेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# सरकार गोंड गोवारी समाजाच्या पाठीशी- आमदार प्रताप दादा अडसड

## गोंड-गोवारी समाजाच्या नागपूर आंदोलनाला आमदार प्रताप अडसड यांनी भेट देऊन बांधवांशी संवाद साधला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नागपूर-** नागपूर हिवाळी अधिवेशनात सुरू असलेल्या गोंड गोवारी समाजाच्या आंदोलनाला आमदार प्रतापदादा अडसड यांनी भेट देऊन समाज बांधवांशी संवाद साधला. भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेत असताना समाजाच्या कास्ट व्हॅलिडिटी संदर्भातील अत्यंत महत्त्वाचा निर्णय झाल्यामुळे, गोंड-गोवारी समाजातील पात्र नागरिकांना दाखले मिळण्यास सुरुवात झाली होती.

या दाखल्यांच्या आधारे मिळणारे लाभ,शैक्षणिक सवलती, शासकीय भरतीतील आरक्षण यांचे दरवाजे समाजासाठी उघडत होते. अनेकांना या निर्णयाचा प्रत्यक्ष फायदा मिळू लागला होता. परंतु २०१९ मध्ये आलेल्या नव्या सरकारने या निर्णयाविरोधात न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. न्यायालयीन प्रक्रियेच्या नावाखाली समाजाला मिळत असलेल्या सर्व लाभांवर अचानक आळा घातला गेला. हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य, युवकांच्या नोकरीच्या संधी आणि



समाजाच्या उन्नतीसाठीच्या योजना थांबल्या. या निर्णयामुळे समाजाला प्रचंड मानसिक, आर्थिक आणि सामाजिक फटका बसला आणि यात हजारी कुटुंबांचे नुकसान झाले.

पण भारतीय जनतापक्षाचे सरकार परत आल्यानंतर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा समाजहिताचे काही ठोस निर्णय घेतले. वडने समितीची स्थापना करण्यात आली असून त्या माध्यमातून गोंड गोवारी समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न आहे. समितीचा अहवाल लवकरात लवकर पूर्ण करून शासनाने निर्णय घ्यावा अशी मागणी आमदार प्रतापदादा यांनी यांनी केली आहे. मी समाजाच्या सोबत पूर्णपणे उभा आहे, गोंड-गोवारी समाजाच्या सर्व प्रमुख मागण्या, तातडीचे प्रश्न, सरकारकडून अपेक्षित निर्णय आणि त्यांच्या भविष्यासाठी लागणाऱ्या सुधारणा हे सर्व मुद्दे मी अधिवेशनात ठामपणे मांडणार असल्याचे यावेळी आमदार प्रतापदादा अडसड यांनी सांगितले.

# नादुरुस्त डीपीचा कहर!

## शिरजगाव मोझरीत उसासह तुरीचे पीक राख

### शेतकरी घाटोळ यांचे साडेतीन लाखांचे नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१२शि.मोझरी**
वीज विभागाच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांवर पुन्हा एकदा संकट कोसळले आहे. मौजा शिरजगाव मोझरी येथे नादुरुस्त डीपीमुळे उस, तूर आणि ठिबक सिंचनास आग लागून शेतकरी प्रभाकर घाटोळ यांचे तब्बल ३.५० लाखांचे प्रचंड नुकसान झाले. गेल्या अनेक दिवसांपासून घाटोळ डीपी नादुरुस्त असून त्याच्या मेंटनन्सबाबत शेतकऱ्यांनी वारंवार तक्रारी केल्या होत्या. तरीही विद्युत विभागाने कोणतीही दखल न घेतल्याने अखेर डीपीतून उसळलेल्या स्पार्कने बुधवारी सायंकाळी ४.३० वाजता ऊस व तुरीचे पीक भस्मसात केले.

खरिपात अतिवृष्टीने पिके वाहून गेलेली आर्थिक संकटाने ग्रासलेला शेतकरी आणि त्यातच शेतीतील नव्या प्रयोगातून ऊस पिकवून उभा केलेला आशेचा पीक. हे पीक काही दिवसांत काढणीस येणार होते. परंतु नादुरुस्त डीपीच्या स्पार्कने शेतकऱ्याच्या हातातला तोंडाशी आलेला घास हिसकावून घेतला. ठिबक सिंचनाचा महागडा संचदेखील आगीत जळून खाक झाला.घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी प्रशासनाला देताच उपकार्यकारी अभियंता गणेश नाईक, तलाठी माळोदे, कृषी सेवक कुंभारे यांनी घटनास्थळाचे पंचनामे केले. पंचनाम्यानंतर नुकसानभरपाईचा प्रस्ताव तातडीने पुढे पाठविण्याचे आश्वासन उपकार्यकारी



> नादुरुस्त डीपीमुळे शेतकऱ्यांचे पिक जळत आहेत. अशा डीपींची तातडीने दुरुस्ती करावी, अन्यथा मोठा संघर्ष उभा राहील.
> **- प्रशांत कांबळे, सामाजिक कार्यकर्ते**

> आगीत माझे साडेतीन लाखांचे नुकसान झाले आहे. विद्युत विभागाने तातडीने नुकसानभरपाई द्यावी.
> **- प्रभाकर घाटोळ, शेतकरी**

अभियंता निलेश उईके यांनी दिले आहे.शिरजगाव मोझरी, शिवणगाव, मालधूर, कोळवण, धोत्रा, वर्हा, माळेगाव, शेंदोळा बु. या परिसरात अनेक डीपी नादुरुस्त असून त्यातून ऑइल गळती व स्पार्किंगच्या घटना नियमित घडत असल्याचा आरोप स्थानिकांचा आहे. भविष्यात मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान होऊ नये म्हणून विद्युत विभागाने तातडीने दुरुस्ती मोहिम राबविण्याची जोरदार मागणी होत आहे.

# जिल्ह्याच्या विकासासाठी सहकार्य करणार

## पालक सचिव आय. ए. कुंदन यांची ग्वाही

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१२अमरावती**



जिल्ह्यातील महापालिका, जिल्हा परिषद आणि जिल्हा प्रशासनाशी चर्चा करण्यात आली आहे. जिल्ह्याच्या दृष्टीकोनातून महत्वाचे विषय मार्गी लावण्यासाठी मंत्रालयस्तरावर पाठपुरावा करण्यात येईल. यात जिल्ह्याच्या विकासासाठी सहकार्य करणार असल्याची माहिती पालक सचिव आय. ए. कुंदनन यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात श्रीमती कुंदन यांनी बैठक घेतली. यावेळी जिल्हाधिकारी आशिष येरेकर, कामगार आयुक्त डॉ. एच. पी. तुम्मोड आदी उपस्थित होते. सुरवातीला जिल्हाधिकारी येरेकर यांनी जिल्ह्यातील पीएम मित्रा पार्क, चिखलदरा येथील स्कायवॉक, मेळघाटातील २५ गावाचा विजेचा प्रश्न, ईको टुरीझम आणि मेळाघाटातीलआरोग्य, दळणवळण, विजेच्या प्रश्नाबाबत माहिती दिली. प्रामुख्याने मेळघाटातील पायाभूत सुविधांसाठी राज्य वन्यजीव मंडळाची बैठक घेऊन जिल्ह्यातील विकासकामांनाआवश्यक असलेल्या परवागीसाठी केंद्रीय वन्यजीव मंडळाकडे पाठविण्याची विनंती केली. तसेच ईको टुरीझमसाठी आवश्यक असणारा ५० कोटी रूपयांचा निधी देण्यात यावा. जिल्ह्यात उद्योगाचे वातावरण होण्यासाठी मोठा उद्योग येण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. जिल्हा परिषदेत प्रामुख्याने वैद्यकीय पदांची भरती शासनस्तरावरून करण्यात सुधारण्यास यावी. यामुळे वैद्यकीय सुविधा मदत मिळेल. महापालिकेतील प्रारूप विकास आराखड्याला मंजुरी मिळावी. दुकाने व गाळ्यांची लिजची मुदत २०१८ मध्ये संपली असल्याने याबाबत शासनाची तातडीने परवागनी मिळावी, यासाठी सहकार्य आवश्यक असल्याचे सांगितले, यावेळी औद्योगिक सुरक्षा मंडळाचा आढावा घेण्यात आला.

# नांदगाव खंडेश्वर तहसीलला अखेर मिळाले दोन नायब तहसीलदार

## एका नायब तहसीलदारासह काही पदे अद्यापही रिक्तच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नांदगाव खंडेश्वर-**
गेल्या अनेक वर्षांपासून नांदगाव खंडेश्वर तहसील कार्यालयात नायब तहसीलदारांसह अनेक महत्त्वाची पदे रिक्त होती. त्यामुळे तालुक्यातील सामान्य नागरिकांची कामे मोठ्या प्रमाणात रखडली होती. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने येथे सुनील राठोड, सदानंद देशपांडे या दोन नायब तहसीलदारांची नियुक्ती करण्यता आली आहे. मात्र अद्यापही एका नायब तहसीलदारासह येथील इतर काही पदे अजूनही रिक्तच आहेत. प्रशासनाने त्याकडेही लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.





विविध विभागांचे अतिरिक्त काम असल्याने येथील कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढला होता. ही बाब जिल्हा प्रशासनाच्या लक्षात आणून दिल्यानंतर येथे दोन नायब तहसीलदारांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये सुनील राठोड, सदानंद देशपांडे यांचा समावेश आहे. राठोड यांच्याकडे निवासी नायब तहसीलदार पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. सदानंद देशपांडे यांची महसूल नायब तहसीलदारपदी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. या दोन्ही नियुक्त्यांमुळे महसूल, प्रमाणपत्रे, फेरफार, नोंदणी, तक्रार निवारण आदी महत्त्वाच्या कामांना गती येण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.वृद्ध, दिव्यांग, निराधार महिलांसाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या संजय गांधी निराधार योजनेच्या नायब तहसीलदार पदावर मात्र अद्याप नियुक्ती झालेली नाही. त्यामुळे पेन्शनसाठी अर्ज करणाऱ्या वृद्धांना पायपीट करावी लागत आहे.

# नगरपरिषद निवडणूक अनुषंगिक प्रशासकीय कामांचा विभागीय आयुक्तांकडून आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**
अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी आज अंजनगाव सुर्जी व दर्यापूर तालुक्यातील तहसील कार्यालय, पंचायत समिती व नगरपरिषद कार्यालयांना भेट देऊन निवडणूक अनुषंगिक प्रशासकीय कामांचा आढावा घेतला.

नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने प्रशासकीय कामकाजांबाबत संबंधित सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार यांच्याकडून आढावा घेतला. यावेळी त्यांनी अंजनगाव सुर्जी व दर्यापूर या दोन्ही तालुक्यातील स्ट्राँगरूमची पाहणी केली. सर्व संबधित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी निवडणूकसंबंधी कामांचे काटेकोर नियोजन करून



**निवडणूक अनुषंगिक प्रशासकीय कामे वेळेत पूर्ण करा-विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल**

अनुषंगिक प्रशासकीय कामकाज वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. सिंघल यांनी यावेळी दिले.

दरम्यान या दौरा प्रवासात विभागीय आयुक्तांनी अंजनगावसुर्जी तालुक्यातील पानपिंपरीच्या शेतीची पाहणी करून त्याबाबतचे औषधीगुण स्थानिक शेतकऱ्यांकडून जाणून घेतले. तसेच वलगाव येथे पुनर्वसन होणाऱ्या गांवाच्या जागेची पाहणी सुद्धा विभागीय आयुक्तांनी यावेळी केली.

# कांता नगरमध्ये २६.८३० ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त

## ३ तस्करांना अटक, ३.९० लाख रुपयांचा माल जप्त

### अमरावती गुन्हे शाखेची मोठी कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**
शहरातील बेकायदेशीर ड्रग्ज तस्करीविरुद्ध कठोर कारवाई करून अमरावती गुन्हे शाखेने एचडी ड्रग्ज तस्करांचे कंबरडे मोडले आहे. अशातच गुरुवारी कांता नगर रोडवर एमडी ड्रग्ज विकणाऱ्या तीन आरोपींना रंगेहाथ अटक करण्यात आली.



आरोपींकडून एकूण ३.९० लाख रुपयांचे २६.८३० ग्रॅमएमडीड्रग्जजप्तकरण्यात आले. अटक करण्यात आलेल्या तीन आरोपींमध्ये सय्यद सोहेल उर्फ फंजू सय्यद गफार (२५, गवळीपुरा), शेख अयान शेख रमजान (२०, हबीब नगर क्रमांक २), आणि सय्यद सैफ अफसर अली (२७, नंदनवन कॉलनी) यांचा समावेश आहे.गुरुवारी गस्तीदरम्यान, गुन्हे शाखेला एक गुप्त माहिती मिळाली की सय्यद सोहेल उर्फ फज्जू आणि इतर दोन आरोपी गॅलेक्सी हॉटेलमधून कांता नगरला एमडी विकण्याच्या उद्देशाने जात आहेत. या माहितीवरून कारवाई करत, पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सापळा रचला आणि तिघांनाही फिल्म स्टाईल अटक केली.आरोपींकडून २६.८३० ग्रॅम एमडी ड्रग्ज - पावडर, तीन मोबाईल फोन आणिइलेक्ट्रॉनिक वजनकाटे, एकूण ३,९०,००० रुपये किमतीचे जप्त करण्यात आले.

**६ महिन्यांत ३६.३७ लाखांचे ड्रग्ज जप्त**

उल्लेखनीय असे की, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चौहान गेल्या ६ महिन्यांपासून अमरावती गुन्हे शाखेचे प्रमुख आहेत. गेल्या ६ महिन्यांत केलेल्या कारवाईवर नजर टाकल्यास, ड्रग्ज तस्करी प्रकरणात आठ कारवाई करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आतापर्यंत ४१ आरोपींना अटक करण्यात आली असून ३६ लाख ३७ हजार रुपयांचे एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले आहेत.

**तीन फरार आरोपींचा जोरदार शोध सुरू**

क्राईम ब्रांच पोलिसांनी अमली पदार्थ तस्करीचा आरोप असलेल्या सय्यदसोहेल उर्फ फंजू सय्यद गफार, शेख अयान शेख रमजान आणि सय्यद सैफ अफसर अली यांना अटक केली. सय्यद अल्तमश सय्यद गफार (अन्सार नगर), शेख नईम उर्फ ? ? राजाशेखरहीमउर्फ होंगा (गवळीपुरा) आणि शेखसोनूशेखरहीम (होंगा) (गवळीपुरा) अजूनही फरार आहेत.आरोपींनी चौकशीदरम्यान सांगितले की जप्त केलेले एमडी या तीन फरार आरोपींकडून मिळाले आहे.

# काही व्यापाऱ्यांकडून सीसीआयची फसवणूक

## बाजार समितीने ६-७ सात/बारे केले रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२परतवाडा,**
गावखेड्यातील व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांची सातबारे ताब्यात घेऊनपिकांच्या फेरबदलाच्या नोंदी केल्याने मोठा प्रकार उघड झाला आहे. या प्रकारामुळे खऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक तोटा व खरेदी प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासनाने तत्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

विदर्भात मोठ्या प्रमाणात कापूस पिकाचे उत्पादन होते.

### सातबाऱ्यावर पिक पेरा नोंदीत बदल

पूर्वी राज्य कापूस पणन महासंघाच्या माध्यमातून कापूस खरेदीची यंत्रणा शासन स्तरावर प्रभावीपणे राबवली जात होती. मात्र ही यंत्रणा बंद झाल्यानंतर केंद्र शासनाच्या वतीने भारत कापूस निगम (सीसीआय) मार्फत आधारभूत किमतीवर कापूस खरेदी केली जात आहे.यंदा शासनाने कापूस खरेदी उशिरा सुरू केल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी गावात फिरणाऱ्या व्यापाऱ्यांना कमी दरातच कापूस विक्री केला. याचाच गैरफायदा घेत काही व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांचे सातबारे गोळा केले. त्यातील संत्रा, सोयाबीन, व अन्य पिकांच्या जागी कापूस पिकाची नोंद दाखवून किसान ॲपवर बोसग नोंदी केल्या. यानंतर तेच व्यापारी हा कापूस शेतकऱ्यांच्या नावावर सीसीआयला विक्री करण्याचा गंभीर प्रकार सुरू आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या नावावर केंद्र शासनाची सरळसरळ फसवणूक होत असल्याचे समोर आले आहे.

# देवस्थानांना दानरूपाने मिळणाऱ्या मुद्रांक नोंदणी शुल्क पूर्णपणे माफ करा संजय पाटील भारतसाकळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ दर्यापूर-** दर्यापूर तालुक्यातील कार्यरत असलेले सार्वजनिक देवस्थान महाराष्ट्र मंदिर महासंघ वर्ष २०२३ पासून मंदिराचे संघटन समन्वयक सुव्यवस्थापन मंदिराची सुरक्षा मंदिराच्या माध्यमातून संस्कृती रक्षण मंदिरांना समस्या सोडवण्यासाठी सहाय्य करणे आधी विविध प्रकारे संस्था कार्यरत आहे या कार्याच्या माध्यमातून १५ अधिक मंदिरे महाराष्ट्र मंदिर महासंघाशी जोडल्या गेली आहेत महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या माध्यमातून व आमच्या मंदिराच्या माध्यमातून उपरोक्त विषयांवर खालील प्रमाणे मागणी करत आहेत त्यामध्ये प्रामुख्याने देवस्थानाने दानरूपाने मिळवणाऱ्या किंवा देवस्थान द्वारे खरेदी केलेल्या जमिनीच्या हस्तांतरण व्यवहारावरील सहकारी संस्था याप्रमाणे मुद्रांक आकारण्यात येणारे तसेच नोंदणी शुल्क व इतर सर्व प्रकारचे शुल्क कर पूर्णपणे माफ करण्याबाबतचे निवेदन तहसीलदार डॉक्टर रवींद्र कानडजे यांना संस्थेचे विश्वस्त संजय नानासाहेब भारसाकडे यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन दिले असून त्यामध्ये इतर काही मागण्याचा समावेश असल्याचे



त्यांनी सांगितले असून दर्यापूर आतील तालुक्यामध्ये कार्यरत असलेल्या सार्वजनिक मंदिर संस्थान तर्फे हे निवेदन देण्यात आले असून त्यामध्ये प्रामुख्याने मारुती विठ्ठल धर्माला संस्थान गणेशपुर अध्यक्ष निलेश श्याम कावडकर, रामचंद्र संस्थान पिंपळद र नंबर १० १५ विश्वस्त भूषण नानासाहेब भारसाकडे, विश्वस्त आतिश जयसिंग बस ओंकारेश्वर मंदिर, दर्यापूर, आशा मनीषा माता देवस्थान मंदिर विश्वस्त संजय नानासाहेब भारत साकडे निलेश शिवराम जटाळे, गणेश लक्ष्मी मंदिर बनोसा विश्वस्त देवेंद्र सर धांडे (उर्फ छोटया) श्री काळेश्वर महादेव संस्थान भुजवाडा तालुका दर्यापूर विश्वस्त धनराज रामदास चव्हाण, गजानन महादेव शेंडोकार, अक्षय अशोकराव सरडे, श्री शंकर आणि रामचंद्र संस्थान बाभळी विश्वस्त एडवोकेट चिऊ भाऊ उर्फ किरण मुकासदार , श्री लाखे, गिरीश भाडेकरू गिरीश भाडेकरी, आजी विश्वस्तांतर्फे तहसीलदार डॉक्टर रवींद्र कानडजे यांना निवेदन देण्यात आले

# लिफ्टच्या बहाण्याने लुटमार, महिलांचा विनयभंग करणारा नराधम पोलिसांच्या जाळ्यात

## शेगाव नाका परीसरातून केली अटक, शहर आणि ग्रामीण भागात अनेक गुन्हे दाखल





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती :**
एकाकी आणि असहाय्य महिलांना पाहून मोटार सायकलवर लिफ्ट देण्याचे आमिष दाखवून निर्जनस्थळी लुटमार व विनयभंग करणाऱ्या कुख्यात आरोपीस पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. अटक करण्यात आलेला आरोपीचे नाव मनीष अनिल जोशी (३३, पार्वती नगर) असे आहे. लुटमार, सोन्याचे दागिने हिसकावणे, रोख रक्कम चोरी करणे आणि विनयभंग असे गंभीर गुन्हे शहर आणि ग्रामीण भागात त्याच्यावर दाखल आहेत.

माहितीनुसार, तिवसा येथील रहिवासी शांता दादाराव भस्मे (५७)यांच्या तक्रारीनुसार ५ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०:३० ते ११:०० च्या दरम्यान टोलनाक्यावर उभ्या होत्या. यावेळी एक अज्ञात व्यक्ती मोटार सायकलवरून आला आणि लिफ्ट देण्याचे सांगत, मी नांदगावला सोडतो असे म्हटले. थोड्या अंतरावर, एका स्मशानभूमीजवळ, आरोपीने त्यांना जबरदस्तीने खाली उतरवले, तिची पर्स आणि २०,००० रुपये रोख रक्कमलटून पळ काढला. या प्रकरणी नांदगाव पेठ - पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रकरणाची दखल घेत गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप चव्हाणयांनी ताबडतोब घटनास्थळी भेट दिली. तपासादरम्यान, गुन्हेगारी रेकॉर्ड असलेल्या गुन्हेगार मनीष अनिल जोशी (३३, पार्वती नगर) वर संशय आला.आरोपी पोलिसांपासून लपून पोलिस पथक मनीषच्या घरीपोहोचले तेव्हा त्यांना ते कुलूपबंद - आढळले. शेजाऱ्यांनी सांगितले की त्याचे कुटुंब गेल्या चार महिन्यांपासून दुसरीकडे राहत आहे आणि त्याचा नवीन पत्ता कोणालाही माहित नाही. त्यानंतर मनीष कठोरा नाका परीसरात पालकांसह आणि भावासोबत राहत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर बुधवारी रात्री उशिरा, मनीष त्याच्या होंडा शाईन मोटारसायकलवरून शेगाव नाकापरिसरात येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. गुन्हे शाखेने ताबडतोब सापळा रचला आणि त्याला घटनास्थळी अटक केली. तपासणी दरम्यान, त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. सखोल चौकशीत अनेक गंभीर गुन्हे केल्याचे उघड झाले. जोशीविरुद्ध शहरातील राजापेठ आणि खोलापुरी गेट पोलिस ठाण्यात आठ गुन्हे दाखल करण्यात आले. असे असूनही, नांदगाव पेठ, भातकुली, सिटी कोतवाली, शिरखेड आणिमोर्शी पोलिस ठाण्यात गुन्हेदाखल असूनही तो फरार होता.

ही कारवाई पोलिस आयुक्त अरविद चावरिया, पोलिस उपायुक्त रमेश धुमल, पोलिस उपायुक्त गणेश शिदे, पोलिस परिमंडळाचे उपायुक्त श्याम घुगे, एसीपी शिवाजी बचाटे, पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण, एपीआयमनीषवाकोडे, फिरोज खान, सतीश देशमुख, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, सय्यद नाझीम, रणजीत गावंडे, प्रभात पोकळे यांनी केली आहे.

# मजुरीच्या शोधात मजुरांवर काळाचा घाला

# बसची पिकअपला धडक

## धारणीतील ३ महिला मजूर ठार



देऊळगाव राजा रोडवर भीषण अपघात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ देऊळगाव राजा**
मजुरीच्या शोधात आलेल्या परराज्यातील दोन महिला मजुरांवर काळाने घाला घातला. भरधाव बसने मजून घेऊन जात असलेल्या मालवाहू वाहनाला मागून धडक दिल्याने ३ महिला ठार तर पाच गंभीर जखमी झाल्या. ही घटना देऊळगावराजा येथे गुरुवार ११ डिसेंबर रोजी सकाळी घडली. मजुरीसाठी मालवाहू वाहनात चढत असतानाच बसने जोरदार धडक दिली. परराज्यातून मजुरीच्या शोधात आलेल्या मजुरांवर काळाने घाला घातल्याने समाजमन हेलावले. जखमी महिलांना प्राथमिक उपचारांनंतर जालना येथील घाटी रुग्णालयात हलविण्यात आले असून त्या सर्वांच्या प्रकृतीची स्थिती गंभीर असल्याचे रुग्णालय प्रशासनाने सांगितले. मायाबाई सुरज काजले (वय ३२), मुक्काम रामखेरा, ता. खगनार, जि. बुरहानपूर, रिचायकाल्याकासदेकर (वय ७२ ), मुक्काम नांदुरी, ता. धारणी, जि. अमरावती व आणखी एक अशी मृतक महिलांची नावे आहेत.

देऊळगावराजा येथील कापूसजिनिगमध्ये परराज्यासह अमरावती जिल्ह्यातून आलेल्या अनेक महिला मजुरांचे वास्तव्य आहे. रोजीरोटीच्या शोधात आलेल्या या महिला गुरुवारला सकाळी साडेसातच्या सुमारास कापूस वेचण्यासाठी पिपळगाव येथे जाण्यासाठी मालवाहू पिक अप (एमएच ३८ ई २०८२) मध्ये चढत होत्या. याच दरम्यान जाफराबाद-जालना मार्गावरून जाणाऱ्या एसटी बस क्रमांक (एमएच २० बीएल २२७६)) नेपिकअपलामागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दोन मजूर महिलांचा जागीच मृत्यूझाला. धडकेची तीव्रता एवढी होती की दोन्ही मृतदेहांचा अक्षरशः चुराडा झाला होता, अशी माहिती डॉक्टर अक्षय गुठे, चालक सुभाष कणखर आणि समाधान आघाव यांनी दिली. या अपघातात सुहानाप्रतिरामइपने (वय १६), रा. नांदुरी, ता. धारणी, खुशबू बबलू पालवी (वय १७), रा. तागमला, ता. खगनार, जि. बुरहानपूर, सुलोचना हारासिग सहारे (वय ३५), रा. भगवानपुरा, ता. नांदोरी, जि. धारणी, पुरुषाने मंगल इपने (वय २२), रा. भगवानपुरा, ता. नांदुरी, ता. धारणी, नर्मदा सोनू इपने (वय ४५), रा. नांदुरी, ता. धारणी, जि. अमरावती आदी गंभीर जखमी झाले आहेत. या सर्व जखमी महिलांना प्रथम देऊळगाव राजा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना तातडीने जालना येथील घाटी रुग्णालयात हलविले.

# विभागीय आयुक्तांनी केली विहीगावच्या खेळाच्या मैदानांची पाहणी

## आ.ज.मो. अभ्यंकर यांनी केला होता मैदानांवर तिक्रमणाचा तारांकीत प्रश्न उपस्थित



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अंजनगाव सुर्जी**
अंजनगाव सुर्जी तालुक्यातील विहिगाव येथील शहानूर नदीकाठावरील एक लाख चौरस फुटांहून अधिक क्षेत्रफळाच्या जमिनीवर सुरू असलेल्या कथित वाळू तस्करी, तसेच गावातील खेळाचे मैदान संपुष्टात येण्याच्या धोका या गंभीर प्रश्नावर विधानसभेत गाजलेल्या चर्चेनंतर आज विभागीय आयुक्तांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली.दि ९ ला विधान परिषद आमदार ज मो अभ्यंकर यांनी हा मुद्दा तारांकित प्रश्नाच्या स्वरूपात उपस्थित केला होता. त्यांनी शहानूर नदीच्या प्रवाहालगत सुरू असलेल्या वाळू तस्करीमुळे नदीकाठी होणारे नुकसान, जमिनीची होणारी झपाट्याने घसरण व खेळाचे मैदान धोक्यात येत असल्याची गंभीर बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. या प्रश्नाला उत्तर देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीने चौकशीची आवश्यकता मान्य करून, ११ डिसेंबरला विभागीय आयुक्तांकडून स्थळ पाहणी करून सविस्तर अहवाल सादर केला जाईल अशी घोषणा केली होती. त्यास अनुसरून आज दि.११ ला विभागीय आयुक्त विहिगाव येथे दाखल झाले. या उच्चस्तरीय संयुक्त पाहणीमध्ये विभागीय आयुक्त श्वेता सिंगलवार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहोपात्रा ,निवासी जिल्हाधिकारी काकडे, उपविभागीय अधिकारी (दर्यापूर) राजेश्वर हांडे,तहसीलदार पुष्पा सोळंके डाबेराव, पंचायत समिती बीडीओ कल्पना जायभाये, रहिमापूर चिंचोली पोलीस स्टेशनचे ठाणेदार अनंत वडतकर, महसूल विभागाचे मंडलाधिकारी व इतर कर्मचार तसेच विहिगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने हजर उपस्थित होते.

सदर पथकाने नदीकाठावरील जमिनीचा ताबा, वाळू उपसा, खेळाच्या मैदानाची सद्यस्थिती, तसेच अतिक्रमणा मुळे होणारे संभाव्य धोके यांची सखोल पाहणी केली. चौकशी दरम्यान ग्रामस्थांनीही आपल्या तक्रारी मांडत वाळू तस्करीमुळे गावाच्या सुरक्षिततेला होत असलेल्या धोक्यांबाबत लक्ष वेधले.या संपूर्ण प्रकरणाला ऊत विधान परिषदेत आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नानंतर मिळाला आहे. विभागीय आयुक्तांकडून लवकरच सविस्तर अहवाल महसूल विभागाकडे सादर करण्यात येणार असून सदर प्रकरणात काय कार्यवाही होते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# दुसऱ्या दिवशीही भाजप कार्यालयावर इच्छुकांची लाट

# २१८ अर्जासह दोन दिवसात ३९७ अर्जाचे वाटप

## आज अर्ज वितरणाचा अखेरचा दिवस, १३-१४ डिसेंबरला मुलाखती होणार

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१२अमरावती-**
आगामी महापालिका निवडणुकीत भाजपकडून लढण्यासाठी इच्छुकांना अर्ज वाटप सुरु झाले असून दुसऱ्या दिवशी सुद्धा राजापेठ स्थित शहर कार्यालयावर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठी गर्दी उसळली होती. गुरुवारला तब्बल २१८ अर्जाची इच्छुकांनी उचल केली. त्यामुळे बुधवारचे १७९ आणि गुरुवारचे २१८ असे मिळून आतापर्यंत ८७ जागासाठी ३९७इच्छुकांना अर्जाचे वाटप करण्यात आले. यावेळी भाजपचे निवडणूक प्रमुख जयंत डेहनकर, शहरा ध्यक्ष डॉ नितीन धांडे, सरचिटणीस बादल कुळकर्णी, रवींद्र खांडेकर, भाजप प्रवक्ता शिवराय कुलकर्णी प्रा. दिनेश सूर्यवंशी आदींची उपस्थिती होती. १२ डिसेंबर पर्यंत सर्व प्रभागांच्या इच्छुक उमेदवारांसाठी फॉर्म उपलब्ध असणार आहेत. गुरुवारला तुषार भारतीय, चेतन गावंडे, सचिन रासने, संजयनरवणे, ललित समदुरकर, मनीष जगताप, केवल पांडे, राजेश शादी, नूतन भुजाडे, रिता मोकलकर, सुधा





तिवारी, लविना हर्षे, गंगा अंबोरे, सुनंदा खरड, स्वाती निस्ताने, पद्मजा कौंडण्य, रेखा भुतडा, विवेक चुटके, कौशिक अग्रवाल, नीता राऊत, विक्की शर्मा, संजय वानरे, संतोष माहुरे यांच्यासह एकूण २१८ अर्जाची उचल केली.

ना. मिसाळ यांची भेटवाटप सुरु असताना भाजपच्या कार्यालयात राज्यमंत्री ना. माधुरी मिसाळ यांनी भेट दिली. आपसातील मतभेद विसरून आपल्याला मनपा निवडणूक जिंकायची आहे. यापूर्वी पदाधिकाऱ्यांना कार्यकर्त्यांना निवडून दिले, आता नेत्यांनी कार्यकर्त्यांला निवडून द्यायचे आहे. भाजपला केवळ भाजपच हरवू शकते. भाजपला पराभूत करण्याची ताकद कोणत्याच पक्षात नाही. त्यामुळे सर्वांनी कामाला लागून पक्षाच्या उमेदवाराला विजयी करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी सर्व उपस्थित पदाधिकारी,कार्यकर्त्यांना केले.

एक रुपयांचे नाणेदरम्यान, अर्जा वितरण सुरु असताना भाजपचे ज्येष्ठ पदाधिकारी सुभाष श्रीखंडे यांनी एक रुपयांची हजार नाणी आणून अर्जाची उचल केली.

## फत्तेपूर येथील पूनम राऊत शेत मजुराचा कापूस वेचताना अचानक आकस्मिक मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२तिवसा-** तिवसा तालुक्यातील फत्तेपूर(जावरा) येथील रहिवासी असलेल्या पूनम अंकुश राऊत(वय ३०) या महिलेचा दि. १० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी आकस्मिक निधन झाले.फत्तेपूर येथील गजानन राऊत यांच्या शेतात कापूस वेचणी साठी पती(अंकुश राऊत)आणि पत्नी(पूनम राऊत) गेले आणि दुपारी जेवण झाल्यानंतर पुन्हा कापूस वेचणी करता गेले असता पूनम राऊत यांना अचानक श्वास भरून आले आणि छातीत सुद्धा दुखायला लागले.सोबतच्या



महिलांनी खूप प्रयत्न केले पण त्यांना अपयश आले.पूनम राऊत यांना तिवसा येथील उपजिल्हा रुग्णालय दाखल करण्यापूर्वी त्यांचे दुःखद निधन झाले.फत्तेपूर येथील पूनम राऊत यांना सात वर्षाचा मुलगा आहे.फत्तेपूर येथील राऊत कुटुंबावर व गावात दुःखाचा डोंगर कोसळला.तिवसा पोलीस स्टेशन मध्ये आकस्मिक मृत्यू ची नोंद करण्यात आली आहे.

# आजपासून क्रीडा सप्ताहाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती-** क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या क्रीडा धोरणानुसार दरवर्षी क्रीडा सप्ताह साजरा केला जातो. यावर्षी देखील १२ ते १८ डिसेंबर दरम्यान विविध क्रीडा स्पर्धा व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, १२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता या सप्ताहाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. १२ डिसेंबर रोजी विभागीय थांगता मार्शल आर्ट क्रीडा स्पर्धा, जिल्हास्तर टेनिस बॉल क्रिकेट क्रीडा स्पर्धा या विभागीय क्रीडा संकुलात सकाळी ११ घेण्यात येणार आहे. १३ डिसेंबर रोजी व्हॉलीबॉल, खो-खो स्पर्धा घेण्यात येतील. १४ डिसेंबर रोजी स्क्वॅश, टेबल टेनिस क्रीडा स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुलात घेण्यात येतील. १५ डिसेंबर रोजी स्पीडबॉल, कॉर्फबॉल श्री. गणेशदासराठीविद्यालय, अमरावती येथे घेण्यात येतील. टेनिस क्रिकेट स्पर्धा विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती घेण्यात येतील. १६ डिसेंबर रोजी रस्सीखेच स्पर्धा गोल्डन किड्स इंग्लिश हायस्कूल, अमरावती येथे, तर डॉजबॉल स्पर्धा श्री. गणेशदास राठी विद्यालय, जिल्हास्तर सिलंबम क्रीडा स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुलात घेण्यात येतील. १७ डिसेंबर रोजी मॉन्टेक्स बॉल क्रिकेट स्पर्धा नरसम्माकॉलेज, अमरावतीयेथे, टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धागो. सी. टोम्पे महाविद्यालय, चांदुर बाजार, नेटबॉल स्पर्धाविभागीय क्रीडा संकुल, धनुर्विद्या क्रीडा स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल येथे घेण्यात येतील. दि. १८ डिसेंबर रोजी स्केटींग, कुडो, मल्लखाम स्पर्धा विभागीय क्रीडा संकुलात घेण्यात येतील. यावेळी सन २०२४-२५ या वर्षात एकविध खेळ संघटनेमार्फत आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंचा सत्कार दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता जिल्हा क्रीडा संकुलात करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व शाळा-महाविद्यालयातील खेळाडूंनी स्पर्धेसाठी आणि राष्ट्रीय खेळाडूंनी सत्कारासाठी नाव नोंदणी दि. १५ डिसेंबरपर्यंत क्रीडा अधिकारी त्रिवेणी बांते, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्याकडे नोंदवावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अनिल इंगळे यांनी केले आहे.

# पुढील आठवड्यात तब्बल ४ दिवस बँका बंद

## खिसमससह विविध प्रादेशिक सुट्ट्यांचा प्रभाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती** डिसेंबर महिन्यातील विविध सण, प्रादेशिक सुट्ट्या आणि नियमानुसार येणाऱ्या आठवडाअखेरच्या बंदमुळे पुढील आठवड्यात देशातील अनेक राज्यांमध्ये बँका चार दिवसांसाठी बंद राहणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी आपल्या बँकिंग व्यवहारांचे नियोजन वेळेत करून ठेवणे आवश्यक आहे.रिझर्व्ह बँकेच्या सुट्टीच्या यादीनुसार दर रविवारी आणि महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी देशभरातील सर्व बँका बंद असतात. त्यानुसार १३





डिसेंबर हा महिन्याचा दुसरा शनिवार असल्याने या दिवशी देशभर बँकांची सुट्टी असेल. १४ डिसेंबर रोजी रविवारी देखील बँका बंद राहतील.

याशिवाय काही राज्यांमध्ये प्रादेशिक कारणांमुळे वेगळ्या सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या आहेत. ९ डिसेंबर रोजी कोची आणि तिरुअनंतपुरम (केरळ) येथे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांमुळे सरकारी बँका बंद राहतील. १२ डिसेंबर रोजी मेघालयात पा. तोगन नेंगमिंजा संगमा यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिलाँगमध्ये बँकांची सुट्टी असेल.

डिसेंबर महिन्यात रिझर्व्ह बँकेने एकूण १८ सुट्ट्या जाहीर केल्या असून त्या सर्व राज्यांमध्ये सारख्याच लागू होत नाहीत. २५ डिसेंबर - ख्रिसमस या दिवशी मात्र देशभरातील सर्व बँका बंद राहतील.बँक ग्राहकांनी व्यवहारांसाठी स्थानिक शाखांच्या वेळा आणि सुट्ट्या तपासण्याचा सल्ला देण्यात आला आहे. सुट्टीच्या काळात एटीएम सेवा नियमित सुरू राहतील, तसेच इंटरनेट बँकिंग व मोबाइल बँकिंगही उपलब्ध असेल.

# बहिरम यात्रेमध्ये राहणार पाणीटंचाई

## प्रशासकीय मान्यता मिळूनही पाणीपुरवठा योजनेचे काम थंडबस्त्यात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२बहिरम-** विदर्भात सर्वाधिक दीड महिना चालणारी बहिरम यात्रा सुरू होण्यासाठी केवळ नऊ दिवस उरले आहेत. असे असतानाही जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग अमरावतीकडून पाणी पुरवठ्यासारख्या प्राथमिक गरजेकडे दुर्लक्ष केले जात आहे. या यात्रेत दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. त्यामुळे प्राथमिक सुविधा निर्माण करणे गरजेचे आहे. यापुर्वी सोयी सुविधेबाबत आलेल्या अडचणींवर उपायोजना करण्याबाबत निर्देश देऊनही लक्ष दिले जात नसल्याची गंभीर बाब पुढे आली आहे.

१५ डिसेंबर २०२३ ला येथील पाणी टंचाई संदर्भात उपाययोजना करण्याबाबत पत्रही देण्यात आले होते. यात्रेत येणारे भाविक, व्यावसायिक, दुकानदार, यात्रेकरूंना पाण्याची अडचण निर्माण होऊ नये, याकरिता वाढीव पाईपलाइन विश्रामगृहापर्यंत टाकण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. त्यानंतर ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद यांनी २०२३-२४ या वर्षाकरिता बोरवेल, हातपंप व जलवाहिनीसाठी राखीव (५ टक्के बंधित) निधीतील आराखड्यातून ६ लाख रुपयांना प्रसाशकीय मान्यताही प्रदान केली. तरीही अद्यापपर्यंत या कामाला सुरुवात करण्यात आली नाही. यात्रेत दरवर्षी होणारी पाणी टंचाई बघता तत्काळ पाणी संदर्भातील उपाययोजना करणे आवश्यक आहे. याबाबत जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाकडून ठोस उपाययोजनेला दिरंगाई होत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. योजनेसाठी तत्काळ निधी मंजूर करून द्यावा. तसेच पाणी पुरवठा योजना तत्काळ पूर्ण करणे आवश्यक आहे. याबाबत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशेष लक्ष घालून ही समस्या निकाली काढणे गरजेचे आहे.

> पाणी टंचाई संदर्भात विभागाकडून आवश्यक ती कारवाई करण्यात आली आहे. प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. २ ते ३ दिवसांत निधी मंजूर होताच काम प्रारंभ केले जाईल. -
> **मैताली उमक,** अभियंता,पाणी पुरवठा विभाग जि.प.चांदूर बाजार



## राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी घेतले महासमाधीचे दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१२गुरुकुंज मोझरी-** नगर विकास, सामाजिक न्याय परिवहन वैद्यकीय शिक्षण विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी गुरुवार ११ डिसेंबर रोजी दुपारी श्वाजता गुरुकुंज मोझरी येथील अखिल भारतीय गुरुदेव सेवाकेसरीमंडळ आश्रमाला भेट देत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या महासमाधीचे दर्शन घेतले.गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने त्यांचा ग्रामगीता ग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी राज्यमंत्री मिसाळ यांनी समाधीस्थळावर नतमस्तक होत महाराजांच्या कार्य,ग्रामगीता विचारधारा तसेच समाज जागृतीच्या परंपरे बद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दन पंत बोथे, सर्वाधिकारी प्रकाश महाराज वाघ, डॉ. राजाराम बोथे, अमोल बाबलं, अरविद राठोड, श्रीकृष्ण पखाले उपस्थित होते

## महापालिका निवडणूक तयारी सुरु

# शिवसेना शिंदेगटाचे संभावित दावेदार जाहिर; वरिष्ठांकडे यादी रवाना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

आगामी महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना (शिंदेगट) तयारी सुरु केली असून संभावित दावेदारांची यादी समोर आली आहे. जिल्हाध्यक्ष संतोष बद्रे यांच्याकडे उमेदवारीसाठी अनेक इच्छुकांनी अर्ज केले असून त्यांची नावे वरीष्ठाकडे पाठविण्यात आली आहे. यात प्रभाग क्र.१ :- पंकज शिवाजीराव मुळे, अंकुश मुकुंदराव कडू, अरुणा विनोदराव इंगोले, सौ. शालीनी देवीदास उगले, संतोष विदासराव मनोहर, प्रमोद गंगाधररावगायवाड यांचा समावेश आहे.

प्रभागक्र. २- सुनिल मिलींदपाटील, कामिनी द्रकांत काळबाडे, कांचन मोहनसिह ठाकुर, पुजा प्रविनराव श्रिवासी, केश गोकुलराव गवाळे, दिपक ज्ञानेश्वर डवाले, शेलेंद्र हरिभाऊ डहाके. प्रभाग क्र.३ :- शुभम सुधाकर दभाडे, नाली विनायक देशमुख, डॉ. पंकज दिगंबर वरे, शुभम सुधाकर दभाडे,प्रभाग क्र. ४: जमद शहा रहमदशहा प्रभाग क्र.५: दिपक दशरथ मदनेकर, रेखा अशोकलाल जैसवाल, सपना सुरेश चव्हाण, डॉ. अभिजित पवार, किशोर लक्ष्मीनारायण दुबे, मनोज दिनकरराव देशमुख.प्रभाग क्र. ६:- परमानद छकलीलाल अहिरवार, कु. ज्योती मोहन शाहु, किरण नितीन दडोरे, सैलेश जयप्रकाश सुर्यवंशी, आनंद लक्ष्मीनारायण गुप्ता, अमर करेसिया प्रभाग क्र.७ करुणा सचिन गुळसुंदरे, अजय राजेंद्र दिगाबर महल्ले, समिर धनजयराव कोरपे, सौ. सुनिता गोपीचंद हासानी, राजेश समयलाल पाठक,प्रभाग क्र. ८ अर्चना सोमेश्वर गजबिये, अंकित प्रकाश वारजुरकर.प्रभाग क्र. ९ कार्तिक रामेश्वर गजभिये, श्याम पदमाकर राऊत, शारदा प्रल्हाद खडाते, वर्षा दिलीप भोयर, संगिता प्रदिप मडावी, सुनिता दिपक साबडे.प्रभाग क्र.१० :-दिप जनार्धन खांडेकर, रुद्र शारदाप्रसाद तिवारी.प्रभागक्र. ११: शिल्पा स्वप्नील गणविर, स्वप्नील शिवदास गणविर, सचिन मनोहरराव बुंदले,प्रभाग क्र.१२:- सोहम कुरील, पीयुश रवी माहुरकर, मोहन भैय्यालाल कुरिल, प्रकाशडाफे, श्रीमती रजनी इसळ, आरती नरेशराव जाधव, भारत छेदीलाल चौधरी, भास्कर मानमोडे, प्रभुदयाल पवार, मैथीली मनीष पाटील. प्रभाग क्र. १३:- रेखाताई राजेंद्र खारोडे, निलम हेमत मालविये, वृदाताई अजय मुब्तेवार, नितेश शर्मा.प्रभाग क्र. १४:- कोमल संतोष बद्रे, राम शंशीकांत पाटील. प्रभाग क्र. १७ : सुवर्णा सुनिल राऊत, राहुल रामकृष्ण माटोडे, सुनिल राऊत, योगेश रघुनाथ विजयकर, वैशाली मनोज पांडे, मनोज जनार्दन पांडेप्रभाग क्र. १८ :- समिर धनजयराव कोरपे,, प्रतिभा बुक्कवार. प्रभाग क्र. १९: मंजुषा प्रशांत - जाधव, प्रविण प्रभाकरराव संगवई, सचिन फणसे, प्रभाग क्र.२० तेजस विश्वनाथ गोतरकर, गजानन विष्णुपंत बिहार, विक्रम रामदास लसणकर, सुवर्णा नरेंद्र वानखडे, रोशना निभोरकर, अश्विनी शिंदे, शारदा प्रल्हाद खडाते, नरेंद्र मनोहर वानखडे, मधुकर शिंदे, गजानन गोमासे. प्रभाग क्र.२१ :- शारदा मुकेश उसरे, सुशिल गव्हाळे, सादिक अली, मुकेश उसरे, आशिष दारोकारप्रभाग क्र. २२ :- कल्पना शेळके, हर्षा लवटे,शारदा उसरे, मनाली पहुरकर, विवेक पवार, ललीत झंझाड, मंगेश गाले, तेजस्विनी सरोदे, उपमा राजेंद्र देवडा, नंदाताई मराठे, मच्छिद्रसिग बावरी, किशोर गणवाणी, संदिप जोशी.

# जन्मतः मूकबधीर बालिकेवर 'कॉक्लियर इम्प्लांट' शस्त्रक्रिया

## 'स्वीच ऑन': चिमुकलीने पहिल्यांदाच ऐकला आवाज : सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल डॉक्टरांचे यशस्वी उपचार : कुटुंबियांसह सर्वांसाठी ठरला आनंददायी क्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती :**

जन्मतः मूकबधीर असलेल्या अडीच वर्षांच्या बालिकेवर येथील विभागीय संदर्भसेवा रुग्णालयात (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) 'कॉक्लियर इम्प्लांट' शस्त्रक्रिया गुरूवारी यशस्वीपणे पार पडली आणि त्यानंतरच्या 'स्वीच ऑन' (साऊंड प्रोसेसर ॲक्टिव्हेशन) प्रक्रियेद्वारे या चिमुकलीने पहिल्यांदाच आवाज ऐकला. हा क्षण उपस्थित सर्वांसाठी आनंददायी ठरला.

चांदूर रेल्वे तालुक्यातील आमला विश्वेश्वर येथे राहणारी बालिका जन्मजात कर्णबधीर होती. येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेद्वारे यावर उपचार होऊ शकतो, अशी माहिती या बालिकेच्या पालकांना मिळाली आणि ते चिमुकलीला घेऊन रुग्णालयात पोहचले. या चिमुकलीच्या कानाची तपासणी करण्यात आली आणि शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. या शत्रक्रियेची 'स्विच ऑन' प्रक्रिया (साउंड प्रोसेसर ॲक्टिव्हेशन) करण्यात आली, यावेळी बालिकेने दिलेला सकारात्मक प्रतिसाद हृदयस्पर्शी होता. या प्रक्रियेनंतर पुढील दोन वर्षे रुग्णाने नियमितपणे ऑडिओलॉजिस्टच्या संपर्कात राहिल्यास बोलणे शिकणे सुलभहोईल, अशी माहिती तज्ज्ञांनी दिली.रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. जीवन वेदी (नाक, कान, घसा तज्ञ, विभाग प्रमुख, इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज, नागपूर), रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी तसेच नाक, कान, घसा तज्ञ डॉ. मंगेश मेंढे, ऑडिओलॉजिस्ट व स्पीच थेरपीस्टलक्ष्मणमोरे, औषधनिर्माण अधिकारी योगेश वाडेकर यांचे शस्त्रक्रियेसाठी विशेष योगदान राहिले.या कार्यक्रमाला डॉ. माधव ढोपरे, डॉ. विक्रांत कुळमेथे, डॉ. उज्वला मोहोड, डॉ. जयश्री पुसदेकर, समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) शितल बोंडे, ऋऋषिकेश धस, कार्यालयीन अधीक्षक श्रीकांत इखे, गुल्हाने, आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. गरीब व गरजू रुग्णांसाठी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमार्फत आधुनिक वमहागड्याउपचार सुविधा विनामूल्य उपलब्ध आहेत.

# चांदूर रेल्वे उपविभागाला अत्याधुनिक मोबाइल फॉरेन्सिक व्हॅनची भेट

## पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांच्या हस्ते लोकार्पण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२चांदूर रेल्वे**

चांदूर रेल्वे उपविभागीय पोलीस कार्यालयात अत्याधुनिक मोबाइल फॉरेन्सिक व्हॅनचे लोकार्पण अमरावती विभागाचे पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांच्या हस्ते व पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांच्या उपस्थितीत गुरुवारी (ता. ११) संपन्न झाले. यावेळी उपविभागीय अधिकारी अनिल पवार यांनी पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कार्यक्रमाला उपस्थित पोलिस दलाने मान्यवरांना मानवंदना दिली. विधीवत पूजन करून मोबाइल फॉरेन्सिक व्हॅनचे उद्घाटन करण्यात आले.

नवीन फॉरेन्सिक व्हॅनमुळे गुन्हे तपासात अधिक अचूकता व वेग येणार असल्याचे पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे यांनी यावेळी सांगितले. पूर्वी गुन्ह्याच्या तपासात पुरावे संकलन प्रक्रियेत त्रुटी राहिल्याने न्यायालयीन निर्णयावर परिणाम होत असे. मात्र, अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या या व्हॅनमुळे घटनास्थळी तत्काळ पंचनामा करता येईल तसेच न्यायवैद्यकीय, भौतिक, रासायनिक, जैविक व डिजिटल अशा सर्व प्रकारचे पुरावे वैज्ञानिक पद्धतीने गोळा करता येणार आहेत. या व्हॅनमध्ये प्रशिक्षित टेक्निशियन, आवश्यक रसायने, आधुनिक तपास उपकरणे उपलब्ध असून उपविभागातील सर्व पोलिस ठाण्यांना ही सुविधा मिळणार आहे. या यंत्रणेच्या वापरामुळे तपास अधिक सुलभ होऊन सात वर्षांपर्यंतच्या शिक्षेच्या गुन्ह्यांत दोषींना शिक्षा होण्याचे प्रमाण निश्चितच वाढेल, असा विश्वास रामनाथ पोकळे यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाला अमरावती ग्रामीणचे पोलिस अधीक्षक विशाल आनंद, डीवायएसपी दिनेश शेळके, उपविभागीय अधिकारी अनिल पवार, चांदूर रेल्वेचे ठाणेदार अजय आकरे, तिवसाचे ठाणेदार गोपाल उपाध्याय, धामणगावचे ठाणेदार गिरीश ताथोड, कुऱ्हाचे ठाणेदार अनुप वाकडे, तळेगाव दशासरचे ठाणेदार किरण औटे, मंगरूळ दस्तगीरचे ठाणेदार गौतम इंगळे आणि इतर पोलिस अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बिबट्यांना पाळीव प्राणी म्हणून मान्यता द्या, मी दोन बिबटे पाळणार

## रवी राणांची बेताल मागणी अन् सत्ताधारी गोंधळात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नागपूर**

सांस्कृतिक राजधानी पुण्यातून विदर्भाची राजधानी नागपूरात देखील बिबट्यांचा प्रश्न काही वनमंत्र्यांची पाठ सोडायला तयार नाही. त्यावरुन वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत केलेल्या विधानानंतर विरोधकांसह सत्ताधारीही सभागृहात हसावे की रडावे अशा स्थितीत होते. त्यांनी एक कोटी रुपयांच्या बकऱ्या बिबट्यांसाठी देणार असल्याच्या त्यांच्या विधानावरुन सुरू झालेल्या चर्चा थांबायच्या असताना आता भाजपा समर्थक रवी राणा यांनी आणखी एक मागणी गुरुवारी केली. राज्यातील अनेक भागांत बिबट्यांचा वावर वाढल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले असताना, बिबट्यांना पाळीव प्राणी म्हणून मान्यता द्यावी, अशी विनंती त्यांनी थेट वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे केली.

नागपूरपासून मुंबईपर्यंत, तसेच अमरावतीसह ग्रामीण आणि शहरी भागांत बिबटे मुक्त संचार करताना दिसत असल्याने या विषयावर हिवाळी अधिवेशनातही व्यापक चर्चा झाली. प्रसारमाध्यमांतही बिबट्यांच्या हालचालींचाच ऊहापोह सुरू आहे. तर अगदी बुधवारी नागपूर शहरात बिबट्याने धुमाकूळ घालत सात जणांना जखमी केले.



या पार्श्वभूमीवर राणा म्हणाले, बिबटे वारंवार शहरी भागात दाखल होत आहेत. त्यामुळे त्यांना पाळीव प्राण्यांचा दर्जा देण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवावा, अशी मी वनमंत्रींना विनंती केली आहे. बाबा आमटे यांनी आपल्या आश्रम परिसरात केलेल्या वन्यप्राणी संवर्धनाचा दाखला देत राणा पुढे म्हणाले, आज अनेक घरांत धोकादायक जातींचे कुत्रे पाळले जातात. त्यापेक्षा लहानपणापासून बिबट्यांचे पालन केले, तर माणूस आणि वन्यप्राणी दोघांचेही रक्षण होईल. मोठ्या प्रमाणावर नसबंदीची गरजही भासणार नाही.

राणा यांनी गुजरातमधील 'वनतारा' प्रकल्पाप्रमाणेच महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात वनतारा स्थापन करण्याची मागणीही केली. अंबानी कुटुंबाने वनतारा प्रकल्पाद्वारे अनेक वन्यप्राण्यांना सुरक्षित आश्रय दिला आहे. महाराष्ट्रातील उद्योगपतींनीही अशा प्रकल्पांसाठी पुढाकार घ्यावा. सरकारने त्यांना तातडीने मान्यता द्यावी, असे ते म्हणाले. यासोबतच राणा यांनी स्वतःहून पुढाकार घेत, सरकारने परवानगी दिल्यास मी दोन बिबट्यांचे पालनपोषण करण्यास तयार आहे, असेही सांगितले. राज्यातील सातत्याने वाढणाऱ्या बिबट्यांच्या हालचाली आणि त्यातून निर्माण झालेल्या भीतीच्या पार्श्वभूमीवर राणा यांनी मांडलेली ही आगळी मागणी सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. राज्यात बिबट्यांचा, वाघांचा प्रश्न गंभीर होत असताना वन्यजीव संवर्धन कायदा, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण याविषयी काहीही माहिती नसलेले लोकनेते असे बेताल वक्तव्य करत असल्याने वन्यजीवप्रेमीही संभ्रमात पडले आहेत.

# मूर्तिजापुरातील केंद्रांवर ६८ हजार क्विंटल कापूस खरेदी

## यंदा शेतकऱ्यांची सोयाबीनऐवजी कापसाला जास्त पसंती



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मूर्तिजापूर**

यावर्षी अतिवृष्टी व पुरामुळे तालुक्यातील हजारो हेक्टरवरील सोयाबीन तसेच मूग, उडीद, तूर आणि शेतकऱ्यांच्या शेतातील कापसाच्या पिकाचे नुकसान झाले होते. तर यावर्षी बऱ्याच शेतकऱ्यांनी सोयाबीनऐवजी कापसाला पसंती दिल्याने कापूस पिकाच्या आधाराने शेतकरी कसे तरी धरून असल्याचे दिसून येत आहे.

शासनाने सीसीआयमार्फत खरेदीला सुरुवात केल्यानंतर आतापर्यंत तालुक्यातील सीसीआय केंद्रांवर ११ डिसेंबरपर्यंत ६८,९८१.१ क्विंटल कापसाची खरेदी करण्यात आली आहे. सद्यःस्थितीत कापसाचे पीक शेतात असून शेतकऱ्यांना पर्यावरणातील बदलत्या घडामोडींमुळे लाल्या रोग तसेच फुलपाती झडती आणि थंडीमुळे कापूस फुटत नसल्याने बोंडअळीच्या धोक्याचा सामना करावा लागत आहे. त्यासोबतच सर्वात मोठे आव्हान म्हणजे रानडुकरांनी मांडलेला उच्छाद आहे. रानडुकरे कापसाची बोंड खात असून कापसाची उभी झाडे मोडत असल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. शासनाने शेतकऱ्यांना शेती संरक्षण कुंपण निर्मिती करिता अर्थसाहाय्य करण्याची मागणी शेतकरी करीत आहेत.शेतकऱ्यांच्या एकरी उत्पन्नात घट होत असून दुसरीकडे मजुरांचा प्रश्न वाढत चालला असून कापूस वेचायचे भाव मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. कापूस वेचाही प्रति किलो बारा रुपयापर्यंत पोहोचली आहे.त्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था उत्पन्न कमी आणि खर्च जास्त अशी झाली आहे. काही भागातील पराठीवर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे शेतकरी सांगत आहे. तालुक्यात एकूण ११,८१६ हेक्टर शेत जमिनीवर कापूस पिकाची लागवड करण्यात आली आहे.

# अंजनगाव बारी बिटस्तरीय क्रीडा महोत्सव रंगला उत्साहात

## सुकळीमध्ये चार केंद्रांतील ३०० खेळाडूंचा जोरदार सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

शिक्षण विभाग, पंचायत समिती अमरावती अंतर्गत अंजनगाव बारी बिटस्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा महोत्सव सुकळी येथील पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या प्रांगणात गुरुवारी उत्साहात पार पडला. चार केंद्रांतील सुमारे तीनशे विद्यार्थी-खेळाडूंनी विविध सांघिक आणि वैयक्तिक क्रीडा प्रकारांमध्ये दमदार सहभाग नोंदवून मैदान गाजविले. निदर्शने व सांस्कृतिक कार्यक्रमालादेखील प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.


कार्यक्रमाचे उदघाटन गटशिक्षणाधिकारी संदिप बोडखे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी सरपंच राजूभाऊ गजभिये होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच मुकुंद लोणारे, समिती अध्यक्ष गुणवंत बोरकर, संजय जवळकर, सौ. मंगला खरड, सौ. अन्नपूर्णा मोटघरे, सौ. बबली कुशवाहा, अंजू कुशवाहा, संतोष मोटघरे, जयमाला पाटील आदी उपस्थित होते.दीप प्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. त्यानंतर बोडखे यांच्या हस्ते क्रीडा ध्वजाचे ध्वजारोहण व क्रीडा ज्योत प्रज्वलित करण्यात आली. सर्व मान्यवरांचे रोपटे देऊन स्वागत करण्यात आले. खेळाडू, पंच, शिक्षक व अधिकारी यांना सारिका शिरपूरे यांनी शपथ दिली.कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, लंगडी यांसारख्या सांघिक तर बॅडमिंटन, टेनिक्काइट, धावणे, लांब उडी, उंच उडी, रिले यांसारख्या वैयक्तिक स्पर्धा उत्साहात पार पडल्या. उद्घाटनाचा कबड्डी सामना सुकळी



विरुद्ध मोगरा संघांमध्ये खेळविण्यात आला, ज्यात सुकळी संघ विजयी ठरला.या प्रसंगी आयडॉल शिक्षक तेजश्री निकम यांच्यासह आदर्श शिक्षिका इंदिरा रेवस्कर व शीतल देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.निदर्शने व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सुकळी, अंजनगाव बारी, बोरगाव धर्माळे, मलकापूर केंद्रातील जिल्हा परिषद शाळांनी सहभाग घेतला. चिमुकल्यांच्या कलाविष्काराला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. परीक्षक म्हणून रोशनी कडू व अश्विनी देशमुख यांनी कार्य पाहिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी संदिप बोडखे यांनी केले. संचालन रुपाली काळे व ज्योत्स्ना गुल्हाने यांनी तर आभार मुख्याध्यापक निखिल सवाई यांनी मानले.

क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी केंद्रप्रमुख मोहन जाधव, संजय कोकाटे, सुमती देखणे, स्मृती बाबरेकर यांच्या मार्गदर्शनात मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला विविध शाळांतील विद्यार्थी, खेळाडू, शिक्षक, केंद्रप्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# एचआयव्ही जनजागृतीसाठी युवकांची सायकल रॅली मार्गस्थ

## उत्स्फूर्त सहभागाने अमरावतीत दिला जागरूकतेचा संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

जागतिक एड्स दिनानिमित्त सुरू असलेल्या एचआयव्ही जनजागृती महोत्सवाचा एक भाग म्हणून अमरावतीत सायकल रॅलीचे भव्य आयोजन करण्यात आले. अडथळ्यावर मात करू, एकजुटीने एचआयव्ही/एड्सला लढा देऊ, नवपरिवर्तन घडवू या घोषवाक्याने सजलेल्या या रॅलीची सुरुवात जिल्हा सामान्य रुग्णालयातून झाली. जिल्हा शल्यचिकित्सक मा. डॉ. दिलीप सौंदळे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीला प्रारंभ करण्यात आला.

रॅलीस उपस्थित सहभागींचे कौतुक करताना डॉ. सौंदळे यांनी जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या एचआयव्ही जनजागृती कार्यक्रमाचे विशेष अभिनंदन केले. युवकांनी अशा उपक्रमांत मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊन जागरूकता वाढवावी, असे आवाहन त्यांनी केले. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून जिल्हा एचआयव्ही निर्मूलनाकडे निश्चित वाटचाल करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.


या प्रसंगी काश्मीर ते कन्याकुमारी सायकलिंग मोहिम यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल नितीन अंभारे आणि वानखडे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार झाला.

रॅलीमध्ये अमरावती जिल्हा सायकलिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष श्री. कळमकर, जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय साखरे, तसेच पियुष क्षीरसागर, श्रीराम देशपांडे, अमिता देशपांडे, कविता धुर्वे, नितीन बोराळकर, जया शिरभाते, वैभव दलाल, आशिष गावंडे यांसह मोठ्या संख्येने सायकलस्वार सहभागी झाले. शासकीय-अशासकीय संस्थांचे अधिकारी-कर्मचारीही मोठ्या संख्येने उपस्थित होते. रॅलीदरम्यान देशभक्तीपर आणि जनजागृतीपर घोषणा दिल्या गेल्या.

रॅलीचा मार्ग जिल्हा सामान्य रुग्णालय-रेल्वे कॉटन मार्केट-जयस्तंभ-राजकमल-श्याम चौक-इर्विन चौक असा होता. जिल्हा सामान्य रुग्णालय येथे अजय साखरे व उपस्थित अधिकारी यांच्या हस्ते रॅलीचा समारोप करण्यात आला.कार्यक्रमाचे संचालन अजय खेडकर, प्रमोद मिसाळ, ब्रिजेश दळवी यांनी केले. आभार प्रदर्शन अजय साखरे यांनी मानले.

# भुलोरी ग्रामपंचायतीत स्वच्छता अभियान व वनराई बंधाऱ्याला वेग

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानांतर्गत ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अचलपूर**

चिखलदरा पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या भुलोरी ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता अभियानासह वनराई बंधारा बांधकामाला वेग आला आहे. सरपंच जासमु साबुलाल बेठे, ग्रामपंचायत अधिकारी कु. मिना सोळंके, कृषिसेवक दिपाली भिलावेकर, सदस्य फुलू बेठे यांच्यासह सर्व अधिकारी-कर्मचारी यांच्या समन्वयातून हे उपक्रम राबविण्यात येत आहेत.गावात गेल्या काही दिवसांपासून स्वच्छता चळवळीला जोरदार प्रतिसाद मिळत असून विशेषतः महिला वर्ग मोठ्या उत्साहाने सहभागी होत आहे. महिलांनी स्वतःहून पुढाकार घेऊन गावातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, नाल्या यांची स्वच्छता करण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे गावात स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण निर्माण होत आहे.

यासोबतच पाणीसाठा वाढविण्यासाठी ग्रामपंचायतीने वनराई बंधारा बांधकामाचे काम गतीमान केले आहे. स्थानिकांच्या सहभागातून श्रमदानाच्या माध्यमातून हे काम केले जात असून पावसाळ्यात पाणी साठवणक्षमतेत वाढ होऊन शेतीस मोठा फायदा होणार आहे.दरम्यान, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान ही नावीन्यपूर्ण योजना सुरू झाल्याने भुलोरी गावात विकासाची नवी उभारी दिसून येत आहे. या योजनेअंतर्गत गावात विविध विकासात्मक उपक्रम राबविण्यास गती मिळाली असून ग्रामस्थ मोठ्या उत्साहाने कामात सहभागी झाले आहेत.ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग, पंचायतीचा समन्वय आणि महिलांचा पुढाकार यामुळे भुलोरी गाव स्वच्छ, सशक्त आणि शाश्वत विकासाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे चित्र आता स्पष्टपणे दिसत आहे.

# दोन दिवसांत अवैध गौण खनिज वाहतूक करणारी तीन ट्रॅक्टर-ट्रॉली व जेसीबी जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

भातकुली तालुक्यात अवैध गौण खनिज वाहतूकीवर आळा घालण्यासाठी महसूल विभागाचे धडक कारवाईचे सत्र सुरूच आहे. ११ आणि १२ डिसेंबर रोजी दोन दिवसांत सलग मोहिमा राबवत पथकाने मोठी कारवाई केली.

१२ डिसेंबर रोजी सकाळच्या सत्रात तहसीलदार अक्षय मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली आसरा गाव परिसरात अवैधरीत्या माती वाहतूक करणाऱ्या तीन ट्रॅक्टर-ट्रॉली तसेच एक जेसीबी जप्त करण्यात आले. गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली असून जप्त वाहने तहसील कार्यालयात जमा करण्यात आली आहेत.यापूर्वीच ११ डिसेंबर रोजी डेगुरखेडा गावात जेसीबीच्या सहाय्याने काळ्या मातीची अवैध वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळताच महसूल पथकाने सकाळी सात वाजता धाड टाकून कारवाई केली.तहसीलदार अक्षय मांडवे यांच्या मार्गदर्शनात नायब तहसीलदार चंद्रकांत मेश्राम, मंडळ अधिकारी संतोष धुर्वे, वैभव बिहाडे, तलाठी संजय बोरकर आणि संदीप निरगुडे यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. अवैध गौण खनिज वाहतूक रोखण्यासाठी भरारी पथकांकडून वाहने तपासणी मोहीम सुरू असून पुढील कारवाईला अधिक वेग देण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

# स्काय वॉक चे काम अंतिम टप्प्यात......




विदर्भाच्या नंदनवनात तयार होतोय काचेचा स्काय वॉक.. स्विझरलँड व चीनच्या तुलनेत जगातील सर्वात लांबीचा स्काय वॉक चिखलदऱ्यात.हरिकेन ते गोराघाट पॉईंट असा ४०७ मीटरचा हा स्काय वॉक असणार आहे.चिखलदऱ्यात तयार होणारा स्काय वॉक हा भारतातील पहिला आहे..त्यामुळे याच आकर्षण देखील मोठ आहे..काही महिन्यात या स्काय वॉकचे लोकार्पण होऊन स्काय वॉक पर्यटकांसाठी सुरू होणार आहे..या स्काय वॉकमुळे चिखलदऱ्यात पर्यटन देखील वाढणार आहे.

# एकनाथ शिंदे वाघ ,उद्धव ठाकरे बिबट आमदार रवी राणांची टोलेबाजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ नागपूर**

शिवसेना ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करण्यात आमदार रवी राणा नेहमी अग्रेसर असतात. शुक्रवारी विधान भवन परिसरात त्यांनी एकनाथ शिंदे यांची तुलना वाघाशी तर उद्धव ठाकरे यांची तुलना बिबटशी करत नवीन चर्चेला पेव फोडले.



आमदार रवी राणा म्हणाले, राज्यातील जंगलांमध्ये बिबटची संख्या वाढत आहे. बिबट हा प्राणी वाघांना घाबरतो. त्यामुळे वाघांचा वावर असलेल्या जंगलात बिबट राहत नाही. त्यामुळे तो शहरी भागाकडे वारंवार दिसत आहे. खरी शिवसेना ही एकनाथ शिंदे यांची आहे. एकनाथ शिंदे हे खरे वाघ आहेत, तर उद्धव ठाकरे हे बिबट आहेत. उद्धव ठाकरे हे एकनाथ शिंदे यांना भितात, असे राणा म्हणाले.

# विभागीय आयुक्त श्वेता सिंगल यांनी केळी,पानपींपरी उत्पादक शेतकऱ्यांच्या शेताला दिली भेट

## व्यस्त कार्यक्रमातही महीला शेतकऱ्यांसोबत साधला संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अंजनगाव सुर्जी**

अधिकारी म्हटला की त्याला आपल्या ठरलेला वेळ,कार्यक्रम यातच बांधून घ्यावे लागते त्यातही विभागिय आयुक्त म्हटले की संपुर्ण अधिकाऱ्यांचा ताफा आणि डायरीवर ठारलेला कार्यक्रमाप्लामाणे चालणे,परंतू येथील पानपींपरी उत्पादक शेतकऱ्यासोबत संवाद साधायला आणि शेती बघायला आवडेल असे स्वतः विभागिय आयुक्त डॉ.श्वेता सिंघल यांनी स्थानीक पत्रकारांना सांगितले आणि त्यांची शेतकऱ्यानप्रती सहानूभुती दिसून आली.गुरुवार ला विभागीय आयुक्त डॉ,श्वेता सिंघल यांचा शासकीय दौरा अंजनगाव सुर्जी तालूक्यात असतांना स्थानीक पत्रकारांशी संवाद साधतांना विभागीय



आयुक्तांनी तालूक्यात प्रामुख्याने पीकवील्या जात असलेल्या शेती वानाविषयी चर्चा केली यावेळी त्यांना अंजनगाव सुर्जी तालूक्यात कपाशी,तूर,सोयाबीन या पारंपारीक पीकासह केळी आणि पानंपीपरी या पीकानबंद्दल माहीती दिली असता त्यांनी शेतात जाण्याविषयी आपले मत व्यक्त केले.त्यावर येथील पत्रकारांनी जवळीलच पान पींपरी उत्पादक शेतकऱ्याच्या शेतात विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांना नेले असता त्यांनी महीला शेतकरी शारदा रविद्र ताडे यांचे सोबत पानपींपरी पीका बद्दल संवाद साधून संपुर्ण माहीती जाणून घेतली ज्यात लागवडीपासून ते एकरी उत्पादना बद्दल,महीला शेतकरी शारदा ताडे यांनी जेव्हा पानपींपरीची रोगामुळे वाळलेली वेल दाखावली त्यावेळी आयुक्तांनी शेतकरी एवढी मेहनत करतो परंतू रोग,नीसर्ग यामुळे त्याला मिळायला पाहीजे ते मिळत नाही.हे दुःख बोलून दाखवले.तसेच केळीऊत्पादक शेतकऱ्यांचीही व्यथा त्यांनी स्वतः शेतात जाऊन ऐकुन घेतली यावर्षी केळीला भाव नसल्याने शेतकऱ्याने केळी पाळून गहू पेरल्याचे शेतकऱ्याने सांगीतल्यावर त्यांनी खेद व्यक्त केला.विभागीय आयुक्त श्वेता सिंघल आपल्या शेतात अनपेक्षित भेट देतात आपली सहानूभुतीने विचारपुस करतात हे पाहून शेतकरी शारदा रविद्र ताडे ,सुलचना गजानन माकोडे,गोपाल गजानन माकोडे,गजानन सीतारामजी माकोडे,प्रतीक्षा गजानन माकोडे,मच्छिद्र येऊल या शेतकऱ्यांना आश्चर्य वाटले आणि त्यांनी जातांना आपल्या शेतातील हेटचाची फुले आयूक्तांना देऊन त्यांचा सन्मान केला.

# मोझरी बसस्थानकात संतापजनक प्रकार

## प्रवाशी उतरविला, चित्रण करताच बस अंगावर घालण्याचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२गुरुकुंज मोझरी**




राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या पावनभूमीत असलेल्या मोझरी बसस्थानकात १० डिसेंबर रोजी प्रवाशासोबत घडलेल्या धक्कादायक घटनेमुळे राज्य परिवहन महामंडळाच्या प्रवासी सुरक्षेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तक्रारदार महेश लांजेवार (रा. तळेगाव ठाकूर) हे दुपारी मोझरी येथून गोंदिया आगाराच्या बस क्र. एमएच १४ एलएक्स ७६४७ मध्ये चढले असता, बस वाहकाने कोणतीही कारणमीमांसा न देता त्यांना बसमधून जबरदस्तीने उतरवले. ही बस तिवसाला थांबत नाही, असे सांगून केलेल्या या वागणुकीदरम्यान प्रवाशाची आई व तिवसा येथील इतर प्रवासी याच बसमध्ये बसलेले असतानाही हा धक्कादायक प्रकार घडल्याचे तक्रारीत नमूद आहे.प्रवाशी महेश लांजेवार यांनी ही दादागिरी मोबाईलवर चित्रित करण्यासाठी बससमोर गेल्यावर परिस्थिती आणखी चिघळली. बस चालकाने थेट बस रेस करून त्यांच्या अंगावर नेण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. एवढेच नव्हे तर चालक-वाहक दोघांकडूनही अत्यंत उद्धट, अपमानास्पद भाषा वापरून जे काय होईल ते करून घे अशी धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकारानंतर महेश लांजेवार यांनी मोझरी बसस्थानक, तिवसा बसस्थानक आणि अमरावती विभागीय कार्यालयात लेखी तक्रार दाखल केली असून, संबंधित कर्मचाऱ्यांकडून लेखी स्पष्टीकरण घेऊन कठोर कारवाईची मागणी केली आहे.

दरम्यान, स्थानिक नागरिकांच्या मते महामंडळाच्या बसांनी शहरातील अधिकृत बसस्थानकातूनच वाहतूक करावी, अशी मागणी वारंवार करूनही काही चालक मुद्दाम बस बायपासवरून नेतात. यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागतो. अनेकांना दीर्घ प्रतीक्षा करावी लागते, तर ज्येष्ठ नागरिकांनाही अशाच वाईट वागणुकीचा सामना करावा लागतो, अशी माहिती पुढे आली आहे.

या मार्गावरील सर्व बसांना तिवसा व मोझरी बसस्थानकात अधिकृत थांबा देण्यात आला आहे. बस चालक-वाहक यांनी थांबा न देणे अथवा प्रवाशांशी गैरवर्तन याकडे गांभीर्याने पाहिले जाईल. संबंधित प्रवाशांच्या तक्रारीची तपासणी करून दोषी वाहकावर आवश्यक ती कारवाई करू. अशी माहिती निलेश बेलसरेवाहतूक नियंत्रक अमरावती यांनी दिली.

# हिवाळी अधिवेशनात वादळी चर्चा 'जातपडताळणी'च्या दोन अधिकारी निलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नागपूर**

बुलढाणा येथील जात पडताळणी विभागाच्या अनागोंदी व मनमानी कारभारावर नागपूर हिवाळी अधिवेशन मध्ये काल गुरुवारी वादळी चर्चा झाली.यावेळी विरोधक आक्रमक झाल्याचे दिसून आले. चर्चे अंती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी बुलढाणा जात पडताळणी विभागाच्या तत्कालीन दोन महिला अधिकाऱ्यांना निलंबीत केल्याची घोषणा केली.

विमुक्त जाती व भटक्या जमाती, अनुसूचित जाती व जमातीचे बोगस जात प्रमाणपत्र निर्गमित केल्याप्रकरणी चौकशी करण्यात आली होती. या चौकशीच्या दोन वर्षानंतर बुलढाणा येथील जात प्रमाणपत्र पडताळणी विभागाच्या तत्कालीन संशोधन अधिकारी वृषाली शिंदे व सामाजिक न्याय विभागाच्या तत्कालीन सहआयुक्त तथा संशोधन अधिकारी अनिता राठोड यांना निलंबित करण्यात आले आहे. काल गुरुवारी हिवाळी अधिवेशनादरम्यान सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे



मंत्री संजय सिरसाठ यांनी सभागृहात निलंबनाची ही घोषणा केली. या कारवाईमुळे जिल्ह्यासह राज्यभरात एकच खळबळ उडाली आहे.

या गंभीर प्रकरणाविषयी २ ऑगस्ट २०२५ रोजी तक्रारकर्ते राजेश राठोड यांनी सामाजिक न्याय मंत्री ना. संजय सिरसाठ यांच्याकडे तक्रार केली. बोगस जात प्रमाणपत्र घेणारे तसेच निर्गमित करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. मराठवाड्यातील मंठा-जालनाचे आमदार राजेश राठोड यांनी हिवाळी अधिवेशनात या प्रकरणात तारांकित प्रश्न उपस्थित केला. त्याला उत्तर देताना सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाठ यांनी बोगस जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित केल्याप्रकरणी दोषी अधिकारी वृषाली शिंदे व अनिता राठोड यांना निलंबित केल्याची घोषणा केली.

# नांदगाव पेठमध्ये दोन दशकांनंतर शंकरपटाचे धमाकेदार पुनरागमन

## संत श्री काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त शंकरपटाचे आयोजन : धुरकऱ्यांसाठी लाखोंच्या बक्षिसांची लयलूट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नांदगाव पेठ**

ग्रामदैवत संत श्री काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त नांदगाव पेठ परिसरात दोन तपानंतर पुन्हा एकदा भव्य शंकरपटाचे आयोजन होत असून, या पारंपरिक स्पर्धेच्या भव्य स्वागतासाठी संपूर्ण गाव सज्ज झाले आहे. युवा शेतकरी मित्र परिवार, नांदगाव पेठ व स्व. हिराबाई गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने २१ व २२ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या या शंकरपटाच्या तयारीची गुरुवारी विधिवत सुरूवात करण्यात आली. पुसदकर महाविद्यालयासमोरच्या विशाल मैदानात स्व. हिराबाई गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष व भाजप जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने यांच्या हस्ते संत काशिनाथ महाराज तसेच संत गजानन महाराज यांच्या प्रतिमेचे तसेच बैलजोडीचे पूजन करून



मैदानाचे भूमिपूजन करण्यात आले. धार्मिकता, परंपरा आणि कृषिसंस्कृतीचा मिलाफ घडवणाऱ्या या सोहळ्याने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण केले.यातील विशेष आकर्षण म्हणजे लाखो रुपयांची बक्षिसांची आकर्षक लयलूट, ज्यामुळे जिल्हाभरातील बैलगाडी मालक, शेतकरी आणि रसिक प्रेक्षक शंकरपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत.दोन दशकांच्या प्रतीक्षेनंतर नांदगाव पेठमध्ये हा मोठा उपक्रम होत असल्याने परिसरात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. यावेळी विवेक गुल्हाने यांनी शेतकरी बांधवांसाठी पाण्याची व्यवस्था, प्रेक्षकांसाठी आसनव्यवस्था, सुरक्षेची जबाबदारी आणि स्पर्धकांना सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भात कटिबद्ध असल्याचे सांगितले.या पूजन सोहळ्याला महाराज सुनील धर्माळे, वीरेंद्र लंगडे,करण मांडवकर, राजेंद्र तुळे, आकाश गुल्हाने, संजय भटकर, हरिदास कापडे, अतुल हटवार, भूषण तुळे, शाम तायडे, अक्षय डाकोरे, अंकुश बोबडे, निलेश कळस्कर, जय सुरजूसे, बाबू बोरकर, वैभव धर्मे, रुपेश इंगळे, ऋषिकेश मुळे यांच्यासह परिसरातील शेतकरी बांधव आणि तरुणाई मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवाच्या निमित्ताने होत असलेला हा ऐतिहासिक आणि भव्य शंकरपट नांदगाव पेठच्या सांस्कृतिक आणि कृषिपरंपरेला नवचैतन्य देणारा ठरणार असून, येत्या २१ व २२ डिसेंबर रोजी होणाऱ्या या शंकरपटात धुरकर्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजन समितीचे रुपेश इंगळे, भूषण तुळे, अक्षय डाखोडे, अंकुश बोबडे, अतुल हटवार, वैभव धर्मे, श्याम तायडे,चरणभाऊ खराटे,ज्ञानेश्वर ढंगे,भास्कर राजुरकर यांनी केले आहे.

# शेतकरी कर्जमाफीचे निकष ठरवण्यासाठी नागपुरात महत्त्वपूर्ण बैठक

## चालू कर्जदारांना मदतीवर एकमुखी जोर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ नागपूर**

राज्यातील प्रस्तावित शेतकरी कर्जमाफीच्या पार्श्वभूमीवर प्रवीणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली आज नागपूर येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. विदर्भातील सर्व जिल्हा मध्यवर्ती बँकांचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष मोठ्या संख्येने या बैठकीस उपस्थित राहिले.कर्जमाफीची अंमलबजावणी कोणत्या निकषांवर करावी, प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि वेगवान कशी ठेवावी तसेच शेतकऱ्यांना अधिकाधिक दिलासा मिळेल याबाबत विस्तृत आणि सखोल चर्चा बैठकीत झाली. विदर्भातील शेतकऱ्यांवर ओल्या दुष्काळाचा मोठा परिणाम झाल्याने अनेक कर्जदार आर्थिक संकटात सापडले आहेत, याची दखल अधोरेखित करण्यात आली.

चालू कर्जदारांना कर्जमाफी देणे अत्यंत गरजेचे असून या संकटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, अशी आग्रही मागणी बैठकीत सर्वानुमते पुढे मांडण्यात आली. कर्जमाफी योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी बँका, शासन व प्रशासनामध्ये समन्वय वाढवण्याचाही निर्णय या बैठकीतून घेण्यात आला.

# रिक्षाचे भाडे मीटरप्रमाणे कधी दिले आठवते का? चालकांची मनमानीच

## मीटर ठरतेय शोभेची वस्तू : रिक्षाचालक सांगतील ते भाडे द्यावे लागत असल्याने प्रवासी अस्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

जिल्ह्यात रिक्षा प्रवासासाठी मीटरनेच भाडे आकारण्याचा नियम असला, तरी प्रत्यक्षात बहुतांश रिक्षाचालक हा नियम पुरता पायदळी तुडवत असल्याचे चित्र दिसत आहे. रिक्षांना मीटर बसवले असले, तरी ते वापरले जात नसल्याने प्रवाशांकडून ठराविक किंवा अवाजवी भाडेवसुली केली जात आहे. रिक्षाचालक सांगेल तेच भाडे द्यावे लागणाऱ्या प्रवाशांना सतत त्रासाला सामोरे जावे लागत असून, मीटर ही केवळ शोभेची वस्तू ठरत चालली आहे.दिवसा काही प्रमाणात भाडे कमी असले, तरी रात्री-बेरात्री मनमानी दरांनी भाडेवाढ केली जाते. इतर वाहतूक साधनांचा पर्याय नसल्यामुळे वाढीव भाडे देणे प्रवाशांना भागच पडते. रेल्वेस्थानकापासून शहरातील सिव्हिल लाइन्स किंवा मामा चौकपर्यंत जाण्यासाठी तब्बल १०० रुपये भाडे आकारले जाते. बस व रेल्वेच्या तुलनेत



रिक्षा भाडे तब्बल जास्त असल्याने प्रवाशी त्रस्त झाले आहेत.शहरी भागात मोठ्या प्रमाणात रिक्षा धावत असूनही मीटरनुसार भाडे आकारणी होत नाही. रिक्षाचालकांकडून नियमांचे उल्लंघन होत असतानाही आरटीओकडून कोणतीही कारवाई होत नसल्याची प्रवाशांची तक्रार आहे. नियमांनुसार रिक्षा मीटरनेच प्रवासी वाहतूक करणे बंधनकारक आहे; परंतु हा नियम कागदोपत्रीच दिसत आहे.तसंच, काही रिक्षाचालक शेअरिंगच्या नावाखाली क्षमतेपेक्षा अधिक म्हणजे पाच ते सहा प्रवाशांना कोंबून नेतात. तीन प्रवाशांची क्षमता असलेल्या रिक्षेत एवढे प्रवासी बसवल्याने जीविताला धोका तर असतोच, शिवाय प्रत्येकाकडून पूर्ण भाडे उकळले जाते.मीटरनुसार भाडे न घेणारे, क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी बसवणारे किंवा अवाजवी दर आकारणारे रिक्षाचालक आढळल्यास आरटीओकडे तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध आहे. मात्र प्रवासी त्याकडे लक्ष देत नाहीत तथापि, कारवाईचा अभाव आणि रिक्षाचालकांची मनमानी यामुळे प्रवासी प्रशासनाकडे तत्काळ उपाययोजना करण्याची मागणी करत आहेत.

# साधू संत झाडावर राहतात काय? अण्णा हजारेंचा संतप्त संवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अहिल्यानगर**

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा नाशिकच्या तपोवनातील वृक्षतोडीवरून सत्ताधारी महायुतीवर निशाणा साधला. या प्रकरणी त्यांनी 'साधू संत झाडावर राहतात काय?' असा सवाल करत एक दिवस लोकच या सरकारला चले जाव म्हणतील असा इशारा दिला. आज लोक बोलत नसले तरी एक दिवस येईल आणि ते चीड व्यक्त करत या सरकारला चले जाव म्हणतील. तो दिवस दूर नाही, असे ते म्हणालेत.

अण्णा हजारे नाशिकच्या तपोवनातील वृक्षतोडीसाठी मैदानात उतरलेत. त्यांनी गुरुवारीच या वृक्षतोडीला कडाडून विरोध करत त्याविरोधात उपोषणाला बसण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर आज सलग दुसऱ्या दिवशीही त्यांनी या प्रकरणी आपला संताप व्यक्त केला. ते एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले, साधू संत झाडावर राहतात काय? ते जंगलात राहतात. हे झाडांचे जंगल आहे. तुम्ही झाडे तोडता. ही विसंगती आहे. हे बरोबर नाही. हे या देशाचे दुर्दैव आहे. एखाद्याने झाडाची फांदी तोडली तरी मला वेदना होतात. मी कुणालाही झाडे तोडू देत नाही. लावतो, पण तोडत नाही.

सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क करा
8605948853


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत